कृषीवल

रायगड, रविवार, दि. १७ नोव्हेंबर २०२४

किंमत ४ ₹

# डिझेलमाफियांसोबत दळवींचे कनेक्शन ?

| अलिबाग | प्रतिनिधी |

डिझेल तस्करीचा गोरखधंदा चालविणाऱ्या राजू पंडितसह गणेश कोळी पोलिसांच्या हिटलीस्टवर आहेत. हेच माफिया दळवींना निवडून आणण्यासाठी उघडपणे प्रचार करीत आहेत. त्यामुळे त्यांचा धंदा अबाधित राखण्यासाठी ते दळवींना मदत करीत असल्याची चर्चा आहे. यानिमित्ताने समुद्रात डिझेल तस्करीचा धंदा राजरोसपणे आ. दळवी यांच्या कृपेने सुरु असल्याची माहिती समोर येत आहे. अलिबाग विधानसभेतील सुज्ञ मतदार डिझेलमाफियांसोबत कनेक्शन असलेल्या दळवींना मतदान करतील का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



राजू पंडित असे डिझेलमाफियाचे नाव आहे. हा मुंबईचा रहिवासी असून, अरबी समुद्रातील डिझेल तस्कर म्हणून ओळखला जातो. परदेशातून तसेच भारतीय पान ५ वर

## राजू पंडितविरोधात दहशतवादी चाईल्ड ॲक्टनुसार गुन्हे

मुंबईमध्ये डीसीपी अंतर्गत सीआयडी गुन्हा रजि. नं. ६५ /२०१५ अंतर्गत ३७९, २८५,३.७.८ तसेच जीवनावश्यक कायदा १९५५ प्रमाणे डिझेल तस्करीची नोंद करण्यात आली आहे. डीसीपी सीआयडी गुन्हा रजि. नं. ६५/२०१६ अंतर्गत ३८७, ५०६, २८५, १२० बी. मोक्का, दहशतवादी अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. यलो गेट पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. २/२०१८ आणि २२४/२०२३ अंतर्गत ४, २१ या संदर्भात नोंद आहे. या गोरखधंद्यात गणेश कोळी याच्याविरोधातदेखील चार गुन्ह्यांची नोंद आहे. लाखो रुपयांची डिझेल तस्करी केल्याची नोंद मुंबई कस्टम, मांडवा सागरी, येलो गेट पोलीस ठाण्यात आहे.

### डिझेल तस्करीविरोधात कोळी महासंघाची तक्रार

रायगड जिल्ह्यातील खाड्यांमध्ये बेकायदेशीर डिझेल तस्करीचा व्यवसाय चालत आहे. या धंद्यातील टोळीचा मुख्य सूत्रधार राजू पंडित आहे. खाडीजवळील बंदरावर व समुद्रात डिझेलचा काळाबाजार करीत आहे. दिवसाला करोडो रुपयांची उलाढाल करीत आहेत. त्यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. राजू पंडितविरोधात ठाणे, मुंबई यलो गेट पोलीस ठाण्यात मोक्कांतर्गत कारवाई झाली आहे. डिझेल तस्करी करणाऱ्या बोटींपासून खाडीत लावलेल्या व समुद्रात लावलेल्या जाळींचे प्रचंड नुकसान होत आहे. त्यामुळे मच्छिमारांवर उपासमारीची वेळ येत आहे. त्यांच्याविरोधात कारवाई व्हावी, पान ५ वर

### न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली

राजू पंडित याच्याविरोधात डिझेल तस्करी, मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता. डिझेल तस्करी रोखण्यासाठी राजू पंडित याला मुंबईत हा धंदा करण्यास न्यायालयाने बंदी घातली. मुंबईत डिझेल तस्करीला बंदी घातल्याने त्याने रायगड जिल्ह्याची निवड केली. अलिबाग, रेवदंडा, श्रीवर्धन परिसरात हा धंदा सुरू केला. न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करता, डिझेल तस्करीचा धंदा रायगड जिल्ह्यात चालू ठेवला. त्याने न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली करीत अरबी समुद्रात हा व्यवसाय सुरु ठेवल्याची माहिती समोर येत आहे.

### राजू पंडित व कडीया यांच्यात वाद

उरणमधील मोरा येथील दिनेश गायकवाड उर्फ कडीया याच्याविरोधात मोरा पोलीस ठाण्यात डिझेल तस्करीची नोंद आहे. मुंबई बांद्रा कस्टमने डिझेलची बोट पकडली होती. रफिक आणि आयुब हे मुंबईमधील असून, राजू पंडितचे डिझेल तस्करीचे पार्टनर आहेत. त्यांनीसुद्धा अलिबाग, रायगड जिल्ह्यात धंदा चालू केला आहे. आयूब व रफिक यांच्याविरोधात येलो गेट पोलीस ठाण्यात अंमली पदार्थ व डिझेल तस्करी केल्याप्रकरणी गुन्ह्याची नोंद आहे. काही महिन्यांपूर्वी श्रीवर्धन समुद्रात मुंबई कस्टमने डिझेलने पान ५ वर




# ...तर दिघी पोर्टच्या कामाला हात लावू देणार नाही

## शरद पवारांचा इशारा



| बोर्ली पंचतन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यातील दिघी येथील आंतरराष्ट्रीय बंदरासाठी स्थानिक शेतकऱ्यांच्या हजारो एकर जमिनी संपादित करण्यात आल्या; परंतु त्यामध्ये स्थानिकांना रोजगार नाही. जर स्थानिक तरुणांना रोजगार मिळणार नसेल, तर दिघी पोर्टच्या कामाला आम्ही हात लावू देणार नाही, असा इशारा शरद पवार यांनी शनिवारी (दि. १६) म्हसळा येथे झालेल्या श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार अनिल नवगणे यांच्या प्रचार सभेत दिला.

आज अनेक प्रश्न आपल्यासमोर आहेत. शेतकऱ्यांच्या शेतीमालाचा, त्यांच्या आत्महत्येचा प्रश्न, महिलांवरील अत्याचार, बेरोजगारी अशा अनेक प्रश्नांच्या मालिका आ वासून उभ्या आहेत. कोरोना काळात या राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रं उद्धव ठाकरे यांच्याकडे होती, त्यावेळी महाविकास आघाडीच्या माध्यमातून एक चांगलं शासन देण्याचा आम्ही प्रयत्न केला. परंतु, पुढील अडीच वर्षांच्या काळात जे काही राजकारण झालं, ते जनतेने अनुभवलं. पुढची अडीच वर्षे यांच्याकडे सत्ता होती, त्यावेळी त्यांना लाडक्या बहिणी आठवल्या नाहीत; परंतु लोकसभेला महाराष्ट्रातील जनतेने ३० ठिकाणी त्यांचा पराभव केल्यानंतर त्यांना लाडक्या बहिणींची आठवण झाली. आज महाराष्ट्रामध्ये महिलांवरील अत्याचाराच्या पान ५ वर

**म्हसळा येथे अनिल नवगणे यांच्या प्रचारार्थ सभा**



### काहींनी कुटुंबाचाच विकास केला

काही लोकांना आम्ही संधी दिली, सत्ता दिली, पाठिंबा दिला जेणेकरून लोकांचे प्रश्न सोडवता येतील, विकास करता येईल. त्यासाठी राज्यात मंत्री बनवलं, अन्य ठिकाणी संधी दिली; परंतु त्यांनी रायगड जिल्ह्याच्या विकासाऐवजी आपल्या कुटुंबाचा म्हणजेच स्वतःचा, मुलीचा, मुलाचा, भावाचा विकास केला, असा टोला शरद पवार यांनी तटकरे यांना नाव न घेता लगावला.

# आमदारकी पुन्हा खेचून आणणार

## शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचा निर्धार



| चिरनेर | प्रतिनिधी |

उरणची आमदारकीची जागा शेतकरी कामगार पक्षाची आहे. दत्ता पाटील यांनी वीस वर्षे, मीनाक्षी पाटील यांनी पंधरा वर्षे, डी.बी. पाटील यांनी वीस वर्षे, तर विवेक पाटील यांनी पंधरा वर्षे आमदार म्हणून विधानसभेत येथील जनतेचे प्रतिनिधीत्व केले. मागील निवडणुकीत चुकून गेलेली आमदारकी पुन्हा खेचून आणायची आहे, असा निर्धार शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केला. त्याचप्रमाणे या जिल्ह्यामध्ये प्रीतम म्हात्रे हे सर्वाधिक मतांनी आमदार म्हणून निवडून येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

उरण मतदारसंघातील विधानसभेचे शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार प्रीतम जे.एम. म्हात्रे यांच्या प्रचारार्थ उरण येथील नानासाहेब धर्माधिकारी प्राथमिक मराठी शाळेच्या मैदानावर जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलत होते.

जयंत पाटील पुढे म्हणाले की, वाजेकर शेठ यांनी या भूमीत गोरगरिबांची कामे केलेली आहेत. मिठागर कामगारांची कामे केली आहेत. त्या कामाचा इतिहास कोणी पुसत असेल, तर तो पुसला जाणार नाही. असं सांगून आगरी वाईट आहेत, कडवे आणि चिकट आहेत. हे कोणी लिहिलं तर ते ब्रिटिशांनी लिहिलं आहे. ब्रिटिश अधिकारी सांगतात, की भारतात कोणाच्याही नादी लागा. पान ५ वर

## वेधक

### दहा दिवस आधीच बोर्डाची परीक्षा

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून यंदा दहावी, बारावीची परीक्षा दहा दिवस आगोदर घेतली जाणार आहे. बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारीपासून, तर इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. इयत्ता दहावीचा पहिला पेपर मराठी, हिंदी व इतर प्रथम भाषा या विषयांचा राहील.इयत्ता बारावी प्रात्यक्षिक परीक्षा २४ जानेवारी ते १० फेब्रुवारी, लेखी परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च तर, इयत्ता दहावी प्रात्यक्षिक परीक्षा ३ ते २० फेब्रुवारीपर्यंत, लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च रोजी होणार आहे.

### गडचिरोलीत बॉम्बस्फोट

**गडचिरोली :** भामरागड येथे शनिवारी सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान पर्लकोटा नदीच्या पुलाच्या ठिकाणी बॉम्बस्फोट झाल्याने खळबळ उडाली. सुरक्षेच्या कारणास्तव भामरागड व अल्लापल्ली मार्गांवरील सर्व वाहने थांबवण्यात आली आहेत. देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी १५ नोव्हेंबरला चंद्रपूरच्या सभेत गडचिरोलीतील नक्षलवाद संपुष्टात आला. ३१ मार्च २०२६ पर्यंत छत्तीसगडमधील नक्षलवाद संपवू, अशी घोषणा केली. त्यातच १७ नोव्हेंबरला ते गडचिरोलीत येणार आहेत. या घोषणेनंतर भामरागडमधून स्फोटाची बातमी आल्याने खळबळ उडाली आहे.

# छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

## पती, सासूविरोधात गुन्हा दाखल

| पनवेल | वार्ताहर |

तालुक्यातील चिंध्रण गावात राहणाऱ्या अस्मिता या विवाहितेचा तिच्या सासरकडील मंडळींनी हुंड्यासाठी शारीरिक आणि मानसिक छळ करुन तिला क्रूरपणे वागणूक दिल्याने अस्मिताने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.

पनवेल तालुका पोलिसांनी मृत विवाहितेचा पती शरद पाटील, सासू पाटील या दोघांविरोधात हुंडाबळीसह आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करत पतीला अटक केली आहे.

मृत अस्मिता हिचा पनवेलच्या चिंध्रण गावात राहणाऱ्या शरद पाटील याच्यासोबत विवाह झाला होता. लग्नानंतचे काही दिवस सुरळीत गेल्यानंतर १०-१२ दिवसांतच अस्मिताचा पती आणि तिच्या सासूने अस्मिताला छळण्यास सुरुवात केली.

ते तिला घरकाम करण्यावरुन सतत घालून पाडून बोलून मारहाण करत होते. तसेच अस्मिताने माहेरुन सोन्याची चेन घेण्यासाठी पैसे आणावेत, यासाठी तिला वारंवार त्रास देत होते. मात्र, अस्मिताने माहेरून पैसे आणण्यास नकार दिल्याने शरद पाटील तिला मारहाण करत होता. याबाबतची माहिती अस्मिता आपल्या भावाला फोनवरुन देत होती. त्यानंतर अस्मिताचा भाऊ ज्ञानेश्वर चौधरी याने शरद पाटील याला अनेकवेळा समजावण्याचा प्रयत्न केला होता.

परंतु, त्याच्या वागण्यात काहीच फरक पडला नव्हता. त्यानंतरदेखील अस्मिताचा पती आणि सासू या दोघांकडून शारीरिक आणि मानसिक छळ सुरु होता. अस्मिताने राहत्या घरामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली.

# आमटेमजवळ बस पलटी

| हमरापूर | वार्ताहर |

मुंबई-गोवाराष्ट्रीयमहामार्गावर पेण तालुक्यातील कोलेटीवाडी व आमटेम या गावांच्या मध्ये तारळ धुमाळवाडी राजापूर येथून मुंबईकडे जाणाऱ्या बसवरील चालकास झोपेची डुलकी लागल्याने बस पलटी होऊन अपघात झाला. या अपघात शुक्रवारी झाला असून, त्यामध्ये चालकासहित सव्वीस जण जखमी झाले आहेत.

याबाबत वडखळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तारळ धुमाळवाडी राजापूर येथून मुंबईकडे जाणाऱ्या बसवरील चालक विनोद हळदणकर हा त्याच्या ताब्यात असणारी बस क्र. एमएच ४७ बीएल- ६२९९ घेऊन मुंबईकडे जात होता. ही बस मुंबई-गोवा महामार्गावरील पान ५ वर

# नागावमध्ये शिंदे गटाची गुंडगिरी

## महिला सदस्येकडून दुसऱ्या सदस्याला मारहाण, राजकारणाने गाठला खालचा थर

| नागाव | प्रतिनिधी |

विधानसभा निवडणूक तोंडावर आली आहे. शिंदे गट दबावतंत्राचा वापर करुन विरोधकांना घाबरविण्याचा प्रयत्न करीत आहे. अशातच शिंदे गटाच्या नागाव ग्रामपंचायत सदस्या अंकिता शेवडे यांनी बॅनर लावण्यावरुन भाजपचे सदस्य रोहन नाईक यांना मारहाण करीत शिवीगाळ केल्याचा प्रकार शुक्रवारी (दि.१५) घडला. यावरुन पुन्हा एकदा महायुतीतील वाद चव्हाट्यावर आला आहे. मात्र एका महिला सदस्याने आपली मर्यादा सोडून ग्रामपंचायत सदस्याला केलेली मारहाण तसेच लज्जास्पद शिवीगाळ ही अलिबागच्या राजकारणाला शोभनीय नसल्याचे मत नागावकरांनी व्यक्त केले आहे.



विधानसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात येऊन पोहचत असताना अलिबाग विधानसभा मतदार संघातील नागाव येथे महायुतीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये बॅनर लावण्यावरून उडालेल्या शाब्दिक चकमकीचे राड्यात रूपांतर झाले. उमेदवाराच्या प्रचाराचा बॅनर लावण्यावरून शिंदेगटातील चौघांनी भारतीय जनता पार्टीच्या ग्रामपंचायत सदस्याला मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकारामुळे महायुतीमधील शिंदे गट आणि भाजपच्या गोटात तणावाचे वातावरण तयार झाले आहे. रोहन नाईक यांनी त्यांच्या पक्षाचा बॅनर त्यांचा मित्र अविनाश आंब्रे यांच्या जागेमध्ये लावला होता . हा बॅनर काढण्याकरिता पोलीस पाटील यांनी तक्रारदार यांना रात्री १ वा फोन करून सांगितले की, बॅनर काढून टाका. ज्या जागेत बॅनर लावला आहे. त्या जागेच्या मालकाची परवानगी घेतली नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर रोहन नाईक बॅनर लावलेल्या ठिकाणी आले. त्यावेळी त्याठिकाणी पोलीस पाटील हजर होते. रोहन नाईक आल्यानंतर शिंदे गटाचे चेतन शेवडे यांनी रोहन नाईक यांना बॅनर काढून टाकण्यास सांगितले. पान ५ वर

**चाळीस हजारांच्या आसपास मतदार जाणार गावाला**

# दुबार मतदारांचा फटका कोणाला?

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

पनवेल विधानसभा क्षेत्रात कामानिमित्त वास्तव्यास असलेल्या अनेक मतदारांची नावे पनवेल विधानसभा क्षेत्रासोबतच आपल्या मूळ गावच्या मतदारसंघातदेखील आहेत. अशी दुबार नावे असलेले हजारो मतदार मतदानाच्या दिवशी गावी जाण्याची शक्यता असल्याने याचा फटका पनवेल विधानसभा क्षेत्रातील उमेदवारांना बसणार आहे.

महाराष्ट्रात एकाच टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. २० नोव्हेंबर रोजी होणार असलेल्या मतदानासाठी कामाधंद्यानिमित्त नवी मुंबई, पनवेलमध्ये राहायला आलेला त्या त्या भागातील मतदार गावी जाण्याची शक्यता आहे. ही शक्यता लक्षात घेत मतदाराला आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी त्या त्या भागातील उमेदवारांनी आपल्या जिल्ह्यातील रहिवासी संघटनाच्या माध्यमातून नवी मुंबई, पनवेलमध्ये मेळाव्याचे आयोजन केले होते. मेळाव्यातून बोलताना आपल्या भागातील मतदारांनी गावी येऊन आपल्यालाच मतदान करण्याचे आवाहन केले आहे.

उमेदवारांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत अनेक मतदार गावी जाण्याची शक्यता आहे. उमेदवारांनीदेखील ही शक्यता लक्षात घेत आपल्या भागातील मतदारांना गावी नेण्या-आणण्याची व्यवस्था केली असल्याची माहिती असून, असे झाल्यास पनवेल विधानसभा क्षेत्रातदेखील नाव असलेल्या मतदारांचा कमी झालेला टक्का कोणासाठी घातक ठरणार, हे पाहावे लागणार आहे.

### टक्केवारी घसरण्याची शक्यता

नवी मुंबई पनवेल परिसरात मान खटाव विधानसभा मतदारसंघातील नारिकांची संख्या मोठी आहे. या मतदारसंघातील जवळपास दहा हजार मतदार गावी जाण्याची शक्यता आहे. त्या खालोखाल पारनेर नगर विधानसभा क्षेत्रातील पाच ते सहा हजार, सांगोला विधानसभा क्षेत्रातील चार ते साडेचार हजार, फलटण विधानसभा क्षेत्रातून अडीच ते तीन हजार, आंबेगाव आणि जुन्नर विधानसभा मतदारसंघातील दीड ते दोन हजार, पुरंदर, भोर आणि बारामती मतदारसंघ आणि धाराशिव जिल्ह्यातील भूमपरांडा विधानसभा क्षेत्रातील नवी मुंबई आणि पनवेलमधील मतदार गावी जाण्याची शक्यता असल्याने पनवेल, नवी मुंबईमधील मतदानाची टक्केवारी घसरण्याची शक्यता आहे.

### मतदानाच्या एकच टप्प्यामुळे अडचण

पूर्वी राज्यात दोन ते तीन टप्प्यात मतदान घेतले जात होते. त्यावेळेस पनवेलमधील मतदान उरकून त्या त्या भागातील मतदार आपल्या गावी मतदानासाठी जात होते. परंतु, आता राज्यात एकाच टप्प्यात होत असल्याने मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

# लाखोंची फसवणूक करणारी महिला गजाआड

| अलिबाग | प्रतिनिधी |

नागरिकांना रक्कम अधिक देण्याचे आमिष दाखवत नागावमधील एका महिलेने अनेकांची आर्थिक फसवणूक केली. आर्थिक गुन्हे शाखेत झालेल्या चौकशीनंतर तिच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तिला अटक केली आहे. अलिबाग येथील न्यायालयाने तिला १८ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावल्याची माहिती पोलिसांनी दिली.

फिर्यादी धीरेंद्र सिंग यांच्या तक्रारीनुसार, अस्मिता पाटील असे या फसवणूक करणाऱ्या महिलेचे नाव आहे. ५० हजार रुपये गुंतवणूक केल्यास सहा दिवसात २५ टक्के नफा, एक लाख गुंतवणूक केल्यास १७ दिवसात ३० टक्के, सात लाख गुंतवणूक केल्यास २० दिवसांत ३० टक्के अशा वेगवेगळ्या सवलती देऊन कमी कालावधीत व्याजदरापेक्षा जास्त रक्कम परतावा देण्याचे आमिष तिने दाखवून लाखो रुपये गुंतविण्यास भाग पाडले. सुरुवातीला तिने विश्वास संपादन केला.

तिच्या या आमिषाला बळी पडत सिंग यांनी लाखो रुपयांची गुंतवणूक त्यांच्याकडे केली. परंतु, त्यानंतर तिच्याकडून ती रक्कम देण्यास टाळाटाळ होऊ लागली. सात लाख ३७ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर सिंग यांनी आर्थिक गुन्हे शाखेत तक्रार केली. सुनील प्रसाद, महेंद्र ठाकूर, कुणाल तळकर, मनीष पाटील, मिहीर ठाकूर, ऋचा ठाकूर यांच्यासह अनेकांची फसवणूक केल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेमध्ये अस्मिता पाटील यांच्याविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे.




# मतदान केल्याची शाई दाखवा, खरेदीवर सवलत मिळवा !

## व्यापाऱ्यांकडून नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन

**। ठाणे । वृत्तसंस्था ।**

जिल्ह्यात मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा निवडणूक विभागासह जिल्हा, महापालिका प्रशासन तसेच विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून मतदान जनजागृतीपर विविध कार्यक्रम राबविले जात असतानाच, आता जिल्ह्यातील व्यापारी वर्ग देखील मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी पुढे सरसावल्याचे दिसून येत आहे. उपनगरातील अनेक व्यापाऱ्यांनी 'मतदान केल्याची शाई दाखवा, खरेदीवर सवलत मिळवा' अशा आशयाची जाहीरात प्रसारित केल्याचे दिसत आहे. मतदानाच्या दिवशी आणि त्यानंतर सलग तीन ते चार दिवस खरेदीवर १० ते २० टक्के पर्यंत सवलती दिल्या जाणार असल्याची माहिती काही व्यापाऱ्यांनी दिली.



विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या २० नोव्हेंबरला मतदान पार पडणार आहे. या निवडणुकीत मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी निवडणूक आयोग तसेच स्थानिक प्रशासनाकडून विविध उपक्रम राबविले जात आहेत. निवडणूक आयोगाच्या स्वीप कार्यक्रमा अंतर्गत विधानसभा मतदार संघात ध्वनीक्षेपक, फलक, पथनाट्य अशा विविध माध्यमातून मतदानाबाबत जनजागृती केली जात आहे. नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावावा यासाठी गुरुवारी ठाणे जिल्ह्यात शासकीय कार्यालय, सामाजिक संस्था, शाळा तसेच महाविद्यालयांमध्ये सामुहिक संकल्पही करण्यात आला. आता, यापाठोपाठ, जिल्ह्यातील व्यापारी वर्ग देखील मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी पुढे सरसावले आहेत. ठाणे तसेच उपनगरातील मोबाईल विक्रेते, कपडे विक्रेते, इलेक्ट्रॉनिक वस्तू विक्रेते अशा अनेक व्यापाऱ्यांनी मतदारांना प्रोत्साहित करण्यासाठी विशेष सवलती दिल्या आहेत. 'मतदान केल्याची शाई दाखवा आणि सवलत मिळवा' अशा आशयाचा अनेक विक्रेत्यांचा संदेश समाजमाध्यमांवर प्रसारित होताना पाहायला मिळत आहे. मतनाच्या दिवशी आणि त्यानंतर पुढील दोन दिवस या सवलतींचा ग्राहकांना लाभ घेता येणार असल्याची माहिती ठाण्यातील एका विक्रेत्याने दिली.

डोंबिवलीतील एका बड्या व्यापाऱ्याने एक पत्रक प्रसारित केल आहे. त्यामध्ये 'प्रिय मतदारराजा' अशी मतदारांना साद घालत, प्रत्येक नागरिकाने मतदान हक्क बजाविणे आपले कर्तव्य आहे. असे म्हणत, जो नागरिक मतदानाचा हक्क बजावेल आणि मतदान केल्याची शाई दाखवेल त्याला ५०० रुपयांच्या आणि त्यावरील खरेदीवर १० टक्के सुट देण्यात येईल असा संदेश लिहिण्यात आला आहे. ही सवलत २० मे ते २३ मे या कालावधीपुरती असणार आहे.

# अहेरीत सहा भाषांमध्ये प्रचार

**। गडचिरोली । वृत्तसंस्था ।**

गडचिरोलीतील अहेरी मतदारसंघात एक, दोन नव्हे तर तब्बल सहा विविध भाषांचा वापर प्रचारासाठी होतो आहे. जिल्ह्याला तीन राज्यांची सीमा लागून असल्याने या भागात गोंडी, माडिया, तेलगू, बंगाली, मराठी आणि हिंदी असे बहुभाषिक नागरिक येथे राहतात. त्यामुळे उमेदवारांनी प्रचारासाठी गाणी, लोकगीते आणि घोषणा सहा भाषांमध्ये बनवून घेतले आहे.

जिल्ह्यात निवडणुकीचा प्रचार रंगात येत असताना अहेरी मतदार संघात भौगोलिक परिस्थितीमुळे उमेदवारांना दररोज तीनशे किलोमीटरचा प्रवास करावा लागतो आहे. दुसरीकडे या मतदारसंघात बहूभाषिक मतदार असल्यामुळे पाच ते सहा भाषांमध्ये मतदारांशी संवाद साधावा लागत आहे. या मतदार संघावर असलेला तेलगू भाषेचा प्रभाव पाहता प्रचारासाठी तेलंगणाच्या निवडणुकीत वापरण्यात येणारी लोकगीते सगळ्याच उमेदवारांनी तेलुगु भाषेत तयार करून मागवून त्या माध्यमातून प्रचार सुरू केला आहे. पथनाट्य ही मतदारांना आकर्षित करत आहेत.

अहेरी हे राज्यातील सर्वात मोठे विधानसभा क्षेत्र आहे. यामध्ये सिरोंचा, एटापल्ली, भामरागड, मुलचेरा आणि अहेरी या पाच तालुक्याचा समवेश आहे.

त्यामुळे प्रचारादरम्यान उमेदवारांची चांगलीच दमछाक होत आहे. येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाकडून राज्याचे अन्न औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम, शरद पवार गटाकडून त्यांची कन्या भाग्यश्री आत्राम, भाजपचे बंडखोर अम्ब्रीशराव आत्राम, माजी आमदार दीपक आत्राम, काँग्रेसचे बंडखोर उमेदवार हणमंतू मडावी, माजी आमदार पेंटा रामा तलांडी यांची कन्या नीता तलांडी प्रहार पक्षाकडून उभे आहेत. धर्मरावबाबा, अम्ब्रीश आत्राम, माजी आमदार दीपक आत्राम, हणमंतू हे अहेरी आणि आलापल्लीत मुक्कामी आहेत. तर भाग्यश्री आत्राम यांनी सिरोंच्यात दोन वर्षांपूर्वी घर बांधल्याने अहेरीत भाड्याचे घर घेऊन ये जा करत असतात.

अहेरी-आलापल्ली-सिरोंचा शंभर किलोमीटर अंतर असून शेवटचे टोक तालुका मुख्यालयापासून १७० किमी इतक्या अंतरावर आहे. विधानसभेतील भामरागड, एटापल्ली व अहेरी तालुक्यात तेलगू पाठोपाठ गोंडी आणि माडिया भाषा बोलली जाते. मुलचेरा तालुक्यात सर्वाधिक बंगाली समाज असल्याने तेथे बंगाली भाषेचा प्रभाव आहे. तर सिरोंचा तालुक्यात सर्वाधिक तेलगू भाषिक असल्याने तेथे तेलंगनाचा प्रभाव आहे. त्यामुळे उमेदवारांनी मराठी हिंदीसह या भाषांमध्ये देखील गाणी, लोकगीत मागवून घेतले आहे.

# महायुतीची डोकेदुखी रिपाइंमुळे वाढणार !

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

विधानसभा निवडणुकीच्या मतदानासाठी अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असून सर्वच राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते प्रचारात सहभागी होत एकमेकांवर टीकेची झोड उठवत आहेत. पुण्यात महायुतीत मित्रपक्ष म्हणून सहभागी असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या काही पदाधिकाऱ्यांनी घेतलेली भूमिका महायुतीला अडचणीची ठरत आहे. भारतीय जनता पक्षाबरोबर मित्रपक्ष म्हणून महायुतीत समाविष्ट असतानाही रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या शहरातील पदाधिकाऱ्यांना सन्मान मिळत नसल्याने रिपाइंच्या गटातील पदाधिकाऱ्यांची नाराजी अद्यापही कायम आहे. भाजपकडून सन्मान मिळत नसल्याने विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला मतदान न करण्याची शपथ या पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे.

मित्रपक्ष असतानाही रिपाइंला सन्मान मिळत नसल्याचा आरोप करून माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांच्या नेतृत्वाखाली काही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली होती. या निवडणुकीत महायुतीला मतदान न करण्याची शपथ या पदाधिकाऱ्यांनी राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ घेतली आहे. ही नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे महायुतीकडून स्पष्ट करण्यात आले होते.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रमुख खासदार रामदास आठवले यांनी यामध्ये पुढाकार घेऊन पदाधिकाऱ्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याला यश आले नाही. आठवले यांनी फोनवरून समजूत काढण्याचा प्रयत्न केल्यानंतरही पदाधिकारी मतदान न करण्याच्या निर्धारावर ठाम असल्याने महायुतीसमोरील अडचणींत वाढ होण्याची शक्यता आहे. भाजप नेत्यांकडे ते वारंवार रिपाइंला विधानसभा निवडणुकीत किमान १२ जागा द्याव्यात, असे म्हणत होते. पण भाजपने किंवा महायुतीमधील अन्य पक्षांनाही या मागणीकडे लक्ष दिले नाही. जागावाटपात आठवले यांना सामावून घेतले नाही. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला मतदान न करण्याची शपथ घेतल्याचे डॉ. धेंडे यांनी सांगितले.

# दीड हजार नागरिकांचा मतदानावर बहिष्कार

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

१६ वर्षांपूर्वी चेंबूरमधील मारवाडी चाळीतील २२५ घरांचे पाडकाम केले. मात्र, अद्याप प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झालेले नाही. यासंदर्भात रहिवाशांनी लोकप्रतिनिधींच्या कार्यालयात अनेक वेळा खेटे घालूनही त्यांच्या पदरात काहीच पडलेले नाही. या विरोधात दीड हजार रहिवाशांनी विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे.

मारवाडी चाळीत २२५ घरे होती. एका विकासकाने १६ वर्षांपूर्वी इमारतीतील घराचे स्वप्न दाखवून झोपु योजना राबविण्याचा मानस व्यक्त केला.

गेली १६ वर्षे हे रहिवासी भाड्याच्या घरात राहत असून त्यासाठी त्यांना पदरमोड करावी लागत आहे. याविरोधात रहिवाशांना भाड्यासाठी आंदोलन करावे लागले. त्यानंतरही दर महिन्याला विकासकाकडे घरभाड्यासाठी हेलपाटे मारावे लागत आहेत, असे एका रहिवाशाने नाव जाहीर न करण्याच्या अटीवर सांगितले. अद्याप झोपु योजनेत नवी इमारत उभी राहू शकलेली नाही. त्यामुळे झोपडीधारकांनी मदतीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींकडे धाव घेतली होती. या प्रश्नावर तोडगा काढण्याची विनंती त्यांना अनेकदा करूनही तोडगा निघू शकलेला नाही.

# अपक्ष उमेदवारांना पिपाणी देऊन रडीचा डाव

## खासदार सुप्रिया सुळे यांची भाजपवर टीका

**। पुणे/बारामती । वृत्तसंस्था ।**

विधानसभा निवडणुकीत २८८ पैकी १६३ जागांवरील अपक्ष उमेदवारांना निवडणुकीसाठी पिपाणी चिन्ह देऊन भाजप रडीचा डाव खेळत आहे. निवडणूक आयोगाने चिन्हाच्या नावामध्ये अपेक्षित बदल न केल्यामुळे साताऱ्यामध्ये युतीचा उमेदवार विजयी झाला, याची कबुली स्वत: अजित पवार यांनी दिली आहे. त्यामुळे भाजप रडीचा डाव खेळत असल्याचे स्पष्ट होत आहे, अशी टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.




राज्यातील सत्तास्थापनेबाबत उद्योगपती गौतम अदानी यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप नेत्यांची २०१९ मध्ये बैठक झाली होती, असा दावा काही दिवसांपूर्वी अजित पवार यांनी केला होता. त्यानंतर त्यावरून त्यांनी घूमजाव केले होते. तर, देवेंद्र फडणवीस यांनीही अदानी या बैठकीला उपस्थित होते, असे स्पष्ट केले होते. त्यासंदर्भात विचारले असता त्या म्हणाल्या की, या बैठकीला अदानी होते की नाही, याची कल्पना नाही. अजित पवार कधी हो म्हणतात तर कधी नाही म्हणातात. त्यामुळे हा प्रश्न अजित पवार यांनाच विचारणे योग्य राहील. तेच त्याचे उत्तर देऊ शकतील, असे खासदार सुळे म्हणाल्या.

शरद पवार यांच्यावर टीका केल्याशिवाय हेडलाइन होत नाही, याची कल्पना आहे. त्यामुळेच भाजप त्यांच्यावर टीका करत आहे. मात्र, पवार यांच्यावर टीका करून महागाईचा प्रश्न सुटणार नाही. भाजपकडे सांगण्यासारखे काही नाही, त्यामुळे ते पवार यांच्यावर टीका करत आहेत. बारामतीमध्ये दादा कोण, हे बारामतीची जनता ठरवेल, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

# पेट्रोल टाकून उमेदवाराचे वाहनच पेटविले

**। यवतमाळ । वृत्तसंस्था ।**

यवतमाळ विधानसभा मतदारसंघातील तिसरी आघाडी प्रहार जनशक्ती पक्षाचे उमदेवार बिपीन चौधरी यांचे वाहन शुक्रवारी मध्यरात्री अज्ञातांनी पेटवून दिले. या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली. यवतमाळच्या इतिहासात निवडणूक काळात या पद्धतीची घटना आजपर्यंत कधी घडली नव्हती. येथील वडगाव परिसरातील गुरूकृपा नगरीत बिपीन चौधरी यांचे वास्तव्य आहे. शुक्रवारी रात्री दीड वाजताच्या सुमारास ते, त्यांचे बंधू आणि समर्थक प्रचाराहून परतले.



त्यानंतर रात्री दोन वाजताच्या सुमारास त्यांच्या शेजाऱ्यांनी फोन करून त्यांचे दुसऱ्या घरासमोर ठेवलेले चारचाकी वाहन जळत असल्याचे सांगितले.

चौधरी व त्यांच्या कुटुंबियांनी घटनास्थळी धाव घेतली तेव्हा संपूर्ण वाहन आगीच्या ज्वालानी वेढले होते. हे वाहन पंचर असल्याने दोन दिवसांपासून घरासमोर उभे होते. घटनेची माहिती तत्काळ आपतकालीन क्रमांक ११२ वर देण्यात येवून अवधूतवाडी पोलिसांना कळविण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळी जावून पाहणी केली. घटनास्थळी माचीस आढळली असून, वाहनावर पेट्रोल टाकून ते पेटवून देण्यात आल्याची शंका उमेदवार बिपीन चौधरी यांनी व्यक्त केली आहे.

यवतमाळात निवडणूक प्रचार शिगेला पोचला असून आरोप, प्रत्यारोपांनी वातावरण ढवळून निघत आहे. महायुती आणि महाविकास आघाडीत लढत होण्याची चिन्हं असताना सर्व शाखेय कुणबी समाजाने सहविचार सभा घेवून प्रहारचे उमेदवार बिपीन चौधरी यांना समर्थन दिले. त्यात समाजातील एका गटाने अन्य उमेदवारासाठी अशीच सभा घेतली. यामुळे गेल्या काही दिवसांपासून बिपीन चौधरी यांच्यावर दबाव वाढत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. या निवडणुत कुणबी समाजाचा सक्षम व तिसरा पर्याय म्हणून समाजाने व सर्वसामान्य नागरिकांनी मला पुढे केल्याने निवडणुकीतील समीकरणे बदलली आहेत. यातूनच काही राजकीय विरोधकांनी आपल्याविरूद्ध षडयंत्र रचून आपल्याला व कुटुंबाला घाबरविण्यासाठी वाहन जाळले, पहिल्यांदाच घडल्याने विविध चर्चा सुरू आहे.

# साडेसहाशे गृहनिर्माण संस्थांमध्ये होणार मतदान

## मुंबईत प्रथमच मोठ्या स्तरावर प्रयोग, मतदान वाढण्याची अपेक्षा

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

लोकसभेच्या वेळी मतदान केंद्रांवर संध्याकाळपर्यंत झालेली गर्दी टाळण्यासाठी यंदा मतदान केंद्रांची संख्या वाढवण्यात आली असून प्रायोगिक तत्वावर गृहनिर्माण सोसायट्यांमध्येही मतदान केंद्र सुरू करण्यात आला आहे. मुंबईत तब्बल साडेसहाशे गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये मतदान केंद्र उभारण्यात येणार आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या वेळी मतदान केंद्राबाहेर लागलेल्या रांगांमुळे मतदारांना उन्हात ताटकळत उभे राहावे लागले होते. एकेका मतदान केंद्रावर जास्त संख्येने मतदार असल्यामुळे मतदानाची वेळही वाढवावी लागली होती. अनेक मतदार मतदान न करताच घरी परतले होते. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या नियोजनावर खूप टीका झाली होती. यावेळी खबरदारी घेऊन विधानसभा निवडणुकीसाठी मतदान केंद्रां ची संख्या वाढवण्यात येणार आहेत. प्रत्येक मतदान केंद्राच्या ठिकाणी पूर्वी असणारी सरासरी दीड हजार मतदारांची संख्या आता सरासरी एक हजार ते १२०० पर्यंत असेल. त्यामुळे लोकसभेच्या तुलनेत मतदान केंद्रांची संख्याही वाढली आहे. यावेळी मुंबईतील मतदान केंद्रांची संख्या १० हजार १११ इतकी आहे. तसेच यावेळी मुंबईतील गृहनिर्माण सोसायट्यांमध्येही मतदान केंद्रे सुरू करण्यात येणार आहे. यावेळी तब्बल साडेसहाशे गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहे.

निवडणूक आयोगाला मतदान केंद्रासाठी जागा ताब्यात घेण्याचे पूर्ण अधिकार आहेत. मात्र तरीही ज्या गृहनिर्माण संस्थांनी ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे त्याच ठिकाणी मतदान केंद्रे उभारले आहे. अन्यथा मुंबईत अनेक शाळा असून त्यात मतदान केंद्रे उभारली आहेत.

# पंतप्रधान मोदींना स्मृतीभ्रंश झालाय

## अमरावतीतल्या सभेतून राहुल गांधींचा हल्लाबोल

**। अमरावती । वृत्तसंस्था ।**

मी जे मुद्दे भाषणात बोलतो, तेच मुद्दे पंतप्रधान मोदी त्यांच्या भाषणात बोलतात. त्याच त्या गोष्टी परत परत सांगतात. कदाचित त्यांना स्मृतीभ्रंश झाला आहे. त्यांचं वागणं बघून अमेरिकेच्या माजी अध्यक्षांची आठवण येते. तेही अनेकदा गोष्टी विसरायचे. पंतप्रधान मोदीसुद्धा आता त्याच मार्गावर आहेत, अशी घणाघाती टीका लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. तसेच धारावीची जागा अदाणींना देण्याचा बदल्यात आमदार विकत घेण्याचा सौदा झाला आणि त्यातून महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचं सरकार पाडण्यात आलं, आरोपही त्यांनी केला. अमरावतीत आज राहुल गांधी यांची प्रचारसभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांनी पंतप्रधान मोदींसह भाजपाला लक्ष्य केलं.

पंतप्रधान मोदी यांना आता स्मृतीभ्रंश झाला आहे. त्यांचं वागणं बघून अमेरिकेच्या माजी अध्यक्षांची आठवण येते. तेही अनेकदा गोष्टी विसरायचे, त्यांच्या बाजुला असलेल्या व्यक्तीला त्यांना आठवण करून द्यावी लागत होती. एकदा युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष अमेरिकेच्या राष्ट्र्ध्यक्षांना भेटण्यासाठी आले होते. नंतर अधिकाऱ्यांनी ते युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष असल्याचे त्यांना सांगितलं. आता पंतप्रधान मोदीही याच मार्गाने जात आहेत, अशी टीका राहुल गांधी यांनी केली.

पंतप्रधान मोदी आणि त्यांचे सहकारी बंद खोलीत बसून संविधानाची हत्या करतात. ज्यावेळी महाराष्ट्रातील सरकार चोरी करण्यात आलं. तेव्हाही अशाचप्रकारे बंद खोलीत बैठक पार पडली होती. या बैठकीला अदाणी, अमित शाह होते. या बैठकीत धारावीच्या जागेच्या बदल्यात आमदार विकत घेण्याचा सौदा झाला आणि राज्यातील जनतेचं सरकार पाडण्यात आलं. अशाप्रकारे हे लोक संविधानाचं रक्षण करतात का? अशाप्रकारे सरकार पाडा असं संविधानात लिहिलं आहे का? मुळात हे सरकार धारावीसाठी चोरण्यात आलं होतं. धारावीची एक लाख कोटीची जमीन त्यांना अदानींना द्यायची होती. त्यामुळे महाराष्ट्राचं सरकार पाडण्यात आलं, असा आरोपही त्यांनी केला.

पंतप्रधान म्हणतात की मी जे पुस्तक दाखवतो, ते रिकामं आहे. यात काही लिहिलेलं नाही. पण हे पुस्तक केवळ संघाच्या कार्यकर्त्यांसाठी रिकामं आहे. भाजपासाठी रिकामं आहे. आमच्यासाठी संविधान हे देशाचा डीएनए आहे. यात आंबेडकर, फुले, शिवाजी महाराज, शाहू महाराज, बुद्ध, नारायण गुरू, बसवण्णा, महात्मा गांधी यांचे विचार आहेत. हे आमच्यासाठी नवं पुस्तक नाही. तर हा हजारो वर्षांपासूनच्या विचारधारेचा दस्ताऐवज आहे, असं राहुल गांधी म्हणाले.

# निवडणुकीमुळे शाळांना तीन दिवस सुट्टी?

## शिक्षण विभागाच्या आयुक्तांना सूचना

**। पुणे । प्रतिनिधी ।**

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. या अनुषंगाने १८, १९ आणि २० नोव्हेंबर रोजी शिक्षकांच्या निवडणूक कर्तव्यामुळे शाळा भरवणे शक्य नसल्यास शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळा बंद ठेवण्याबाबत निर्णय घेण्यासंदर्भात आवश्यक त्या सूचना देण्याचे निर्देश शिक्षण विभागाने शिक्षण आयुक्तांना दिले आहेत.



राज्यात विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू आहे. निवडणूक प्रक्रियेतील कामकाज आणि प्रत्यक्ष मतदानाच्या प्रक्रियेत शिक्षकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. तसेच अनेक मतदान केंद्रेही शाळांमध्ये असतात. मतदानासाठीची तयारी करण्यासाठी निवडणूक प्रशासन शाळा ताब्यात घेते. या पार्श्वभूमीवर १८, १९ आणि २० नोव्हेंबर रोजी शाळांना सुटी देण्याचा प्रस्ताव शिक्षण आयुक्तालयाने शिक्षण विभागाला सादर केला होता. या अनुषंगाने शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी परिपत्रकाद्वारे शिक्षण आयुक्तांना निर्देश दिले आहेत.

शाळांतील बहुसंख्य शिक्षकांना निवडणुकीच्या काम करावे लागत असल्याने शाळेत शैक्षणिक कामकाज होऊ शकत नाही. तसेच काही ठिकाणी शाळांमध्ये मतदान केंद्र असते. त्यामुळे त्या ठिकाणीही पूर्वतयारी करावी लागते. ही बाब लक्षात घेता शाळा बंद ठेवाव्या लागू शकतात. त्यामुळे शाळांना सुट्टी देण्याचा निर्णय योग्य ठरतो. या संदर्भात शाळा व्यवस्थापन आणि स्थानिक प्रशासन यांनी स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेणे उचित ठरेल. मात्र, सरसकट सुट्टी देणेही योग्य ठरणार नाही, असे माजी मुख्याध्यापक महेंद्र गणपुले यांनी सांगितले.

# मोदी,शाहांविरुद्ध एफआयआर करा

## काँग्रेसची निवडणूक आयोगाकडे तक्रार

**। नागपूर । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव संदेश सिंगलकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्याविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. राज्य घटना बदलण्यासाठी ४०० जागांवर विजय मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे एवढ्या जागा भाजपला द्या, असे आवाहन भाजप खासदारांनी लोकसभा निवडणुकीत केले होते. त्याविरोधात ही तक्रार आहे. संविधान संपण्याच्या प्रयत्नांना भाजप पक्षश्रेष्टी स्पष्टपणे पाठिंबा देत असल्याचा आरोप करण्यात आला असून बभाजप नेत्यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्याची मागणी केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांनी त्याच्याविरुद्ध कोणतीही कारवाई केली नाही आणि विधाने परत घेतली नाहीत. मोदी, शहा आणि नड्डा हे असंविधानिक विचारांचे समर्थक असल्याचे यावरून दिसून येते, असे सिंगलकर यांनी म्हटले आहे.

## वर्सोव्यात अल्पसंख्याक मतांवर भवितव्य

# भाजपसाठी लढत कठीण

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

**वर्सोवा विधानसभा मतदारसंघात गेली दोन वर्षे सलग निवडून आलेल्या भाजपच्या आमदार भारती लव्हेकर यांना यंदा ही निवडणूक जिंकण्यासाठी मोठी मेहनत घ्यावी लागणार आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उमेदवार अमोल कीर्तिकर यांना तब्बल २१,०९० मतांची आघाडी मिळवून देणाऱ्या या मतदारसंघात मोठ्या प्रमाणात असलेल्या मुस्लीम मतदारांच्या हाती लव्हेकर यांचे भवितव्य आहे.**

२००८ मध्ये झालेल्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर हा मतदारसंघ अस्तित्वात आला. २००९ मध्ये ही जागा काँग्रेसकडे होती. मात्र, २०१४ मध्ये मोदी लाटेत लव्हेकर चांगल्या मताधिक्याने निवडून आल्या. लव्हेकर या मूळच्या दिवंगत आमदार विनायक मेटे यांच्या शिवसंग्राम पक्षाच्या. मात्र, २०१४ पासून त्यांनी भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढविली आणि विजयी ठरल्या. २०१९ च्या निवडणुकीत एकत्रित शिवसेनेच्या राजुल पटेल यांचा अधिकृत अर्ज बाद होऊन त्या अपक्ष उभ्या राहिल्या, हे लव्हेकर यांच्या पथ्यावर पडले.

आता मात्र तशी स्थिती नाही. लव्हेकर यांना लोकसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेली मोठी पिछाडी कमी करण्यासाठी खूपच मेहनत घ्यावी लागणार आहे. 'एमआयएम' चे रईस लष्करिया, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संदेश देसाई आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे बंडखोर राजू पेडणेकर यांच्यात होणाऱ्या मतांच्या विभाजनामुळे लव्हेकर यांना फारसा फायदा होईल, असे वाटत नाही. शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे या मतदारसंघात फारसे प्राबल्य नाही. त्यामुळे लव्हेकर या किती मुस्लीम मते मिळवितात, यावर त्यांचे विजयाचे गणित अवलंबून आहे. लव्हेकर यांना यावेळी उमेदवारी मिळेल किंवा नाही, याबाबत शेवटपर्यंत साशंकता होती. अगदी शेवटच्या क्षणी त्यांची उमेदवारी जाहीर झाली. उपविभागप्रमुख असलेल्या हारुन खान यांना अल्पसंख्याक म्हणून उमेदवारीची संधी मिळाली आहे. अल्पसंख्याकांची किती मते घेण्यात त्यांना यश येते, यावर विजयाचे गणित अवलंबून आहे. या मतदारसंघात एक लाख सहा हजार (३८ टक्के) मुस्लिम, ६५ हजार (२३ टक्के) उत्तर भारतीय आणि त्या खालोखाल ५७ हजार (२० टक्के) मराठी, २२ हजार ७०० (आठ टक्के) गुजराती-मारवाडी, १४ हजार ६०० (पाच टक्के) दक्षिण भारतीय या मतदारांवर उमेदवारांची भिस्त आहे.

### २०१९ मधील मते

**२०१९ मध्ये डॉ. भारती लव्हेकर यांना ४१ हजार ५७ तर काँग्रेसचे बलदेव खोसा यांना ३६ हजार ८७१ मते मिळाली. अपक्ष उभ्या राहिलेल्या राजुल पटेल यांनी ३२ हजार ७०६ तर मनसेचे संदेश देसाई यांना फक्त पाच हजार ३७ मते मिळाली होती. लव्हेकर या फक्त पाच हजार १८६ मतांनी विजयी झाल्या होत्या.**

**मतदार संख्या : एकूण मतदार दोन लाख ८६ हजार ७११ : पुरुष एक लाख ५३ हजार ३९२, महिला एक लाख ३२ हजार ७७६.**


खंडाळे


वेश्वी


शिवाई बांधण

## आ. बालदींवर आगरी समाजाची नाराजी




**उरण :** उरण विधानसभा मतदारसंघात निवडणूक अंतिम टप्प्यात आली आहे. त्यामुळे उमेदवारांकडून प्रचारात जोर मारताना दिसत आहे. यावेळी आगरी कोळी समाजा विरोधात भाजपा उमेदवारांकडून बेताल वक्तव्ये केल्याप्रकरणी आगरी समाज आक्रमक होऊन प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आगरी समाजाच्या उमेदवाराला मतदान करण्याचे आवाहन केले जात आहे. याप्रसंगी उरण सामाजिक संघटनेचे अध्यक्ष सुधाकर पाटील यांच्या नेतृत्वाखाली इतर सहकारी गावोगावी बॅनर हाती घेऊन आगरी समाजाच्या उमेदवाराला मतदान करण्याचे आवाहन करत आहेत. यामुळे उरण विधानसभा मतदारसंघातील आगरी-कोळी-कराडी समाजामध्ये भाजपा उमेदवार महेश बालदी यांच्या विरोधात संतापाची लाट पसरली आहे. सामाजिक कार्यकर्ते व आगरी समाजाचे पदाधिकारी सुधाकर पाटील यांच्याबद्दल समाजात समाधान व्यक्त केले जात आहे. यामुळे नक्कीच समाजातील जनतेत मत परिवर्तन होईल, अशी चर्चा उरण विधानसभा मतदारसंघात सुरू आहे.

**■ आगरी समाजाच्या उमेदवाराला मतदान करण्याचे आवाहन**

## गृह मतदानाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**नागोठणे :** विधानसभा निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने जारी केलेल्या आदेशानुसार ८५ वर्ष व त्यावरील वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिक असलेल्या मतदारांसाठी गृह मतदान मोहीम राबविण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून नागोठणे शहरातील १० मतदान केंद्रात नाव समाविष्ट असलेल्या वयोवृद्ध मतदारांचे मतदान पत्रिकेद्वारे शुक्रवारी (दि.१५) मतदान घेण्यात आले.

नागोठणे शहरात घेण्यात आलेल्या गृह मतदान प्रक्रियेसाठी एकूण १६ मतदार होते. त्यापैकी १५ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. विधानसभेच्या पेण मतदार संघातील पथक क्रमांक १८ ने नागोठण्यातील वयोवृद्ध मतदारांच्या घरोघरी जाऊन हे गृह मतदान घेतले. यावेळी रोहा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी तथा झोनल ऑफिसर शुभदा पाटील-कुलकर्णी, नागोठणे तलाठी तथा मतदान केंद्राध्यक्ष गणेश विटेकर, नागोठणे ग्रामविकास अधिकारी तथा सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष राकेश टेमघरे, मतदान केंद्र स्तरीय अधिकारी किसन शिर्के, भास्कर घाग व पथकातील इतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून नागोठण्यातील गृह मतदान प्रक्रिया सुरळीतपणे पूर्ण केली.

## सचिन डाऊर यांचा पाठींबा



**उरण :** उरण विधानसभा मतदारसंघातील प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. त्यामुळे उमेदवारांकडून मतदारांना आकर्षित करण्यासाठी चढाओढ सुरू आहे. शेकापचे तरुण उमेदवार प्रीतम म्हात्रे यांना मतदारांचा वाढता पाठींबा मिळत असल्याने करंजा गावातील सामाजिक कार्यकर्ते सचिन डाऊर यांनी जाहीर पाठींबा देऊन त्यांना विजयी करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

सचिन डाऊर प्रीतम म्हात्रे यांना पाठींबा देत म्हणाले की, आगामी विधानसभा निवडणुकीत उरण मतदारसंघातील गावागावातील मुलभूत समस्या, रस्ते, पाणीटंचाई, स्वच्छता, आरोग्य, बेरोजगारी, सुसज्ज रुग्णालय या समस्या भेडसावत असून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची व्यवस्था उरणमध्ये नसल्यामुळे नवी मुंबई किंवा मुंबईमध्ये जावे लागत आहे. आगामी काळात उभारण्यात येत असलेल्या लोकनेते स्वर्गीय दि.बा.पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळावर असणाऱ्या नोकरीत स्थानिक प्रकल्पग्रस्त तरुणांना समाविष्ट करण्याचा विषय, तसेच करंजा-रेवस सागरीसेतूमध्ये नोकरी आणि व्यावसायिक संधी या सर्व गोष्टींचा विचार करीता प्रश्न मार्गी लावण्यासाठी शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे हे सक्षम आहेत. तसेच, त्यांना मतदारसंघात दिवसेंदिवस वाढता पाठींबा मिळताना दिसत आहे. त्यामुळे प्रीतम म्हात्रे यांना माझ्यासह सहकार्यांच्या साथीने जाहीर पाठींबा देत असल्याचे सामाजिक कार्यकर्ते सचिन डाऊर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

# कर्तबगार नेता प्रीतम म्हात्रे

**। चाणजे । वार्ताहर ।**

उरण विधानसभा मतदारसंघातील शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्याकडे येथील मतदार आस्थेने व अपेक्षेने पाहात आहे. त्यामुळे उरण तालुक्याला एक कार्यक्षम व समाजसेवेला वाहुन घेणारा कर्तबगार नेता प्रीतम म्हात्रे यांच्या रूपाने मिळाला असुन जनतेच्या हाकेला धावून येणारा नेता आहे, असा विश्वास उरणचा प्रत्येक मतदार व्यक्त करीत आहेत.



निवडणुक लढवित असलेले उमेदवार मा.आ. मनोहर भोईर व आ. महेश बादली यांनी उरणचे आमदार पद भुषविले आहे. मात्र, या दोन्ही उमेदवारांनी आमदार पदाच्या कार्यकाळात कोणतीही विकास कामे केली नाहीत. तसेच, त्यांनी साधा जनसंपर्क देखील साधला नसून अशा अकार्यक्षमांना येथील मतदार घरी बसवतील, अशा चर्चा उरण विधानसभा मतदासंघात होत आहेत. मतदारांच्या भावना व अपेक्षा लक्षात घेऊन शेकापचे कार्यकर्ते मोरेश्वर भोईर यांनी सांगीतले की, गेल्या निवडणुकीत निवडून आलेल्या उमेदवारापेक्षा आताचे उमेदवार प्रीतम म्हात्रे हे कर्तव्यदक्ष, कर्तबगार तसेच मतदारांच्या हाकेला उभा राहाणारा नेता आहे. यामुळे प्रीतम म्हात्रे यांनाच निवडून द्यावे, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे. यावेळी उरण तालुका महिला आघाडीच्या अध्यक्षा सीमा घरत, सुप्रिया म्हात्रे, शंकर भोईर, मनिष कातकरी आणि शेकापचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## वंचित बहुजन आघाडीचा पाठिंबा

**पनवेल :** तीनवेळा आमदार राहूनही नागरिकांना मुलभूत सोईसुविधा देण्यास आ. प्रशांत ठाकूर अपयशी ठरले आहेत. २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या पनवेल विधानसभा निवडणूकीत भाजपाला शह देण्यासाठी शेकापचे उमेदवार बाळाराम पाटील यांना पनवेल तालुक्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांचा प्रचंड पाठिंबा मिळत आहे. त्यामुळे बाळाराम पाटील यांची उमेदवारी आता अधिक बळकट झाली आहे. दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी बाळाराम पाटील यांना पक्षाचा पाठिंबा जाहिर केला आहे. वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर यांनी पाठिंब्याचे पत्र शुक्रवारी बाळाराम पाटील यांना दिले आहे. वंचितच्या प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर यांनी बाळाराम पाटील यांना पाठिंबा जाहिर केल्याचे शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल प्रवक्ते महादेव वाघमारे यांनी ही माहिती दिली.



## प्रीतम म्हात्रेंच्या बुथचे उद्घाटन

**उरण :** भेंडखळ येथे शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्या बूथचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे महादेव बंडा, ज्येष्ठ नागरिक के. एस. ठाकूर, विजय ठाकूर कौस्तुभ ठाकूर, किशोर ठाकूर, ग्रामपंचायत सदस्या सोनाली ठाकूर, स्वाती घरत, शितल ठाकूर, नीलम भोईर, अक्षता ठाकूर, अनिल ठाकूर, हसूराम भोईर, उमेश ठाकूर, वैभव ठाकूर, भेंडखळ पंचायत गणचे अध्यक्ष लिलेश्वर ठाकूर आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा पाठिंबा

**उरण :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आर.के) आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, भारतीय बौद्ध महासभा उरण यांनी शेतकरी कामगार पक्षाचे उरण विधानसभेचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांना पाठिंबा दिला आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आर.के. ) चे पक्षाध्यक्ष राजाराम खरात यांनी प्रीतम म्हात्रे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. यावेळी प्रीतम म्हात्रे यांना बहुमताने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. तर, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आणि भारतीय बौद्ध महासभा उरण अध्यक्ष पंकज सोनावळे यांनी प्रीतम म्हात्रे यांना पाठिंबा देऊन सर्व पदाधिकारी, पक्षाशी निगडित असलेल्या तमाम आंबेडकरी जनता आणि सर्वसामाजिक संस्थेच्यावतीने जाहीर पाठिंबा दिला आहे. यावेळी प्रीतम म्हात्रे यांना विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## प्रचारार्थ बाईक रॅली, सभेचे आयोजन

**उरण :** उरण विधानसभा शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्या प्रचारार्थ रविवारी (दि.१७) करंजाडे आणि मोहोपाडा हद्दीत बाईक रॅली आणि सभेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी दुपारी २ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत चिंचवन पुल, शिरढोण थांबा, सांगुर्ली थांबा, तूरमाळे थांबा, पळस्पे थांबा, नांदगाव थांबा, जेएनपीटी उड्डाणपुलावरून माणघर श्री स्वामी समर्थ मठ, भंगार पाडा, कुंडे वहाळ, ओवळे फाटा, दापोली पारगाव थांबा, कोल्ही, कोपर वाघिवली वाडा, चिंचपाडा सेक्टर १ व २, करंजाडे सेक्टर ३ ते ६, कॉलेज फाटा, वडघर थांबा येथे बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. तर, सायंकाळी ४ ते ७ वाजेपर्यंत करंजाडे सेक्टर ४ येथे सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, सायंकाळी ४ वाजता चौक शहर, नढाल, त्यानंतर वरोसे, लोधीवली, दांडफाटा, रीस, कांबे, चांभारली, मोहोपाडा येथे बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री ७ ते १० वाजेपर्यंत मोहोपाडा येथील अचानक क्रिकेट क्लब मैदानात सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

# चळवळीच्या उमेदवारला स्थानिकांची पसंती

## रमाकांत पाटील यांचे वक्तव्य

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्याचा विकास केवळ मा. आ. विवेक पाटील यांनीच केला आहे. नंतरच्या काळात आलेल्या आमदारांनी येथील लोकांच्या गरजा काय आहेत, त्यांना कोणत्या सोयी सुविधा हव्यात, याकडे दुर्लक्ष केले आहे. मा.आ. विवेक पाटील यांच्या पराभवाचा वचपा शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांना भरघोस मतांनी निवडून आणून काढू, असा विश्वास उरण विधानसभा अध्यक्ष रमाकांत पाटील यांनी कृषीवलशी बोलताना व्यक्त केला आहे.

पढे बोलताना ते म्हणाले की, उरण येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याच्या नुसत्या घोषणाच झाल्या असून प्रत्यक्षात कागदावरच मंजुरी मिळालेली आहे. उरण मतदार संघातील उरणसह पनवेल, खालापूर, चाणजे, करंजा, केगाव, घारापुरी आणि पूर्व भागातील काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे.

येथे औद्योगीकरण झाले असले तरी बेरोजगाराची संख्या वाढत चालली आहे. तसेच, निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांमुळे वाहतूक कोंडीसह मोरा बंदरातील गाळाची समस्या डोकेदुखी ठरत आहे. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना साडेबारा टक्के भूखंड वाटप आणि इतर प्रश्न सुटलेले नाहीत. नैनासह अलिबाग-विरार कॉरिडोर, तिसरी मुंबई या प्रकल्पात शेतकऱ्यांना मोबदल्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. विद्यमान आमदारांनी विकास करण्या ऐवजी भकास केल्याचे दिसत आहे. त्यामुळे दररोज वाहतूक कोंडी, रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य, नोकरभरती आणि इतर समस्यांचा सामना आजही करावा लागत आहे.आता उरण मतदार संघाला स्थानिक लोकांच्या गरजा पूर्ण करणारा आमदार हवा आहे. त्यामुळे प्रीतम म्हात्रे यांच्यासारख्या चळवळीच्या उमेदवारला येथील लोकांची पसंती आहे. त्यामुळे प्रीतम म्हात्रे यांनी घेतलेल्या सभांमधून त्यांनी लोकांशी साधलेला संवाद त्यांना विजयी करण्याचे काम करेल, असा विश्वासही रमाकांत पाटील यांनी व्यक्त केला.



# प्रीतम म्हात्रेंच्या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण येथे शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्या प्रचारार्थ काढलेल्या मोटरसायकल रॅलीला उरण शहर व परिसरातील गावातून तरूणांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. उरणच्या कोट नाक्यावरून निघालेल्या रॅलीत तरुण युवक, शहरातील व्यापारी उद्योजक व कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शुक्रवारी (दि.१५) महागणपती चिरनेर येथे बाप्पाचे दर्शन घेऊन प्रीतम म्हात्रे यांची मोटरसायकल रॅली पुढे भोम, कळंबूसरे, मोठी जुई, कोप्रोली, पानदिवे, पिरकोन, सारडे, वशेणी, पुनाडे, पाले, गोवठणे, आवरे, कोप्रोली, खोपटा, उरण शहर येथे नेण्यात झाली. या रॅलीला प्रचंड प्रतिसाद मिळाला. यावेळी 'येऊन येऊन येणार कोण, प्रीतम दादा शिवाय आहेच कोण', 'उरणचे आमदार प्रीतम दादा होणार', अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला होता. यावेळी जेएनपीटी कामगार नेते रवि घरत, प्रवक्ते रमाकांत म्हात्रे, निधी ठाकूर आदींच्या प्रमुख उपस्थितीत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

## अतुल म्हात्रे यांच्या प्रचारार्थ रॅली

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

पेण - सुधागड - रोहा विधानसभा शेकापचे उमेदवार अतुल म्हात्रे यांची प्रचार रॅली शनिवारी (दि.१६) पालीतील श्री गणपती मंदिर ते श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत काढण्यात आली. या रॅलीचे नेतृत्व शेतकरी कामगार पक्षाचे नेते सुरेश खैरे यांनी केले. यावेळी उमेदवार अतुल म्हात्रे हे देखील उपस्थित होते. या रॅलीत तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, पक्षाचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रॅलीदरम्यान पाली शहरात लाल बावटे की जय, शेतकरी कामगार पक्षाचा विजय असो, अतुल दादा आगे बडो हम तुम्हारे साथ हे, अशा घोषणा देऊन कार्यकर्त्यांनी पाली परीसर दणाणून सोडला होता. या रॅलीचे अभूतपूर्व स्वरूप बघून विरोधकांना घाम फुटला असेल. तसेच, शेतकरी कामगार पक्षाची तालुक्यात ताकद काय आहे ही २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदानाच्या दिवशी आपल्या मतदानातून दाखवून द्यायची आहे. सुधागड तालुक्याच्या विकासात शेकापचे योगदान खूप आहे. यापुढे ही तालुक्याचा विकास करण्यासाठी आपल्याला आपल्या हक्काचा आमदार अतुल म्हात्रे यांना बहुमताने निवडून अणायचे आहे, असे आवाहन शेकाप नेते सुरेश खैरे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले.



यावेळी, अतुल म्हात्रे यांनी उपस्थित समुदायाला संबोधित करताना म्हणाले की, सुधागड तालुक्यातील तरुण रोजगारानिमित्त मुंबई, पुणे, ठाणे येथे जातो. मात्र, या तरुणांना तालुक्यात रोजगार निर्माण करण्याच्या अनेक संधी आहेत. सुधागड हा पर्यटन तालुका आहे. पर्यटनावर आधारित पर्यावरण पूरक अनेक व्यवसाय निर्माण करून तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मी कटिबद्ध असेन, असे त्यांनी सांगितले.

## नितीन सावंत यांना बहुमत मिळणार

### सुवर्णा जोशी यांचा विश्वास

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत विधानसभा मतदारसंघात चुरशीची लढत असून महाविकास आघाडी पुरस्कृत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उमेदवार नितीन सावंत यांनी कर्जत शहरात प्रचारात आघाडी घेतली आहे. कर्जत शहर शिवसेनेचा बालेकिल्ला असून या मतदारसंघात शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उमेदवार नितीन सावंत यांना बहुमत मिळवून देण्यासाठी महाविकास आघाडी सज्ज आहे, असा विश्वास शिवसेना महिला आघाडी संघटक सुवर्णा जोशी यांनी व्यक्त केला आहे.

कर्जत शहरात महाविकास आघाडीच्या प्रचाराची जबाबदारी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या महिला आघाडीच्या जिल्हा संघटक सुवर्णा जोशी तसेच माजी शहर प्रमुख संतोष पाटील, शहर प्रमुख निलेश घरत, माजी शहर प्रमुख भालचंद्र जोशी आदींच्या नेतृत्वाखाली प्रचाराची धुरा सांभाळली जात आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार नितीन सावंत यांच्या पत्नी रसिका सावंत या आघाडीवर राहून कर्जत शहरातील घरोघरी जाऊन प्रचार करीत आहेत. तसेच, कर्जत शहरातील काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे कार्यकर्ते देखील मशाल चिन्हाचा प्रचार करीत आहेत. प्रचाराची धुरा वाहणाऱ्या महिला आघाडी जिल्हा संघटक सुवर्णा जोशी आणि रेखा ठाकरे यांनी आघाडीवर राहून कर्जत शहरात महाविकास आघाडीचे उमेदवार नितीन सावंत यांना आघाडी मिळवून देण्यासाठी चंग बांधला आहे. प्रचारात मोठ्या प्रमाणावर महिला वर्ग उतरला असल्याने कर्जत शहरात महाविकास आघाडीचे उमेदवार आघाडीवरच राहतील, असा विश्वास जोशी व्यक्त करीत आहेत.



**■ कर्जतमध्ये मविआची प्रचारात आघाडी**

**■ महिला वर्गाचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद**

# आंतरभरती प्रवाह बंद झाल्याने पाणजे पाणथळ कोरडी



। उरण । वार्ताहर ।

जैवविविधतेने नटलेल्या व पक्षी निरीक्षणाचे ठिकाण असलेल्या उरणमधील पाणजे येथील वादग्रस्त २८९ हेक्टर पाणथळ परिसरात येणारे आंतरभरती पाण्याचे प्रवाह बंद करण्यात आल्याने ही पाणथळ कोरडी झाली आहे. येथील अधिकारी निवडणूक कर्तव्यावर असल्याने दुर्लक्ष होत असलेल्या पर्यावरणवाद्यांनी दावा केला आहे. या संदर्भात पर्यावरण विभागाकडे तक्रार केली आहे.

हा कालावधी परदेशी स्थलांतरित पक्षी येण्याचा आहे. पाणथळी कोरड्या झाल्याने पक्षी संख्या ही घटण्याची शक्यता आहे. अशाच प्रकारे २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या काळातही, उरण आणि वाशीमध्ये मोठ्या ओल्या जमिनी आणि खारफुटीचे पट्टे गाडले गेले होते. त्यानंतरच्या अधिकृत तपासणीनंतर नुकसानीची शहानिशा करूनही कोणतीही कारवाई झाली नसल्याबद्दल पर्यावरणवादी कार्यकर्त्यांनी खेद व्यक्त केला.

११ नोव्हेंबर २०२० च्या राज्य पर्यावरण संचालकांच्या आदेशानुसार, सिडकोने पाणथळ जमिनीवर भरतीच्या पाण्याचा प्रवाह कायम ठेवायचा होता. तरीही नगररचनाकार त्याचे उल्लंघन करत आहेत, असे सागर शक्तीचे प्रमुख नंदकुमार पवार यांनी स्पष्ट केले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर जैवविविधता निर्देशांकात भारत १८० देशांपैकी १७६ व्या क्रमांकावर आहे आणि आम्ही पाणजेची जैवविविधता पुन्हा निर्माण करायला सुरुवात केली आहे, असे मत नॅटकनेक्ट फाऊंडेशनचे संचालक बी.एन. कुमार यांनी व्यक्त केले आहे.

तीस स्थलांतरित पक्ष्यांसह किमान ५० प्रजातींचे पक्षी आकर्षित करणारी पाणजे पाणथळ आता आंतरभरतीच्या पाण्याच्या प्रवाहात अडथळा आणल्यामुळे कमी-अधिक प्रमाणात मृत पावत असल्याचेही मत त्यांनी व्यक्त केले आहे. तर पाणजे पाणथळ जमीन नष्ट झाल्याने उरणवर आपत्ती ओढवू शकते. कारण समुद्र भरतीचे येणारे पाणी इतरत्र गेले तर पूर येईल. आंतरभरतीयुक्त ओलसर जमीन पुरल्यामुळे गावांमध्ये आधीच अवेळी पूर येत आहेत. त्यामुळे हा प्रश्न गांभीर्याने घेऊन पाणजे पाणथळ जमिनीचे संवर्धन करावे, असे आवाहन त्यांनी केले. सरकारी आदेशात स्पष्टपणे नमूद केले आहे की खारफुटीच्या अस्तित्वामुळे पाणथळ जागा हे सीआरझेड क्षेत्र आहे आणि त्यामुळे भरतीच्या पाण्याचा प्रवाह अविरत असला पाहिजे, असे मतही त्यांनी व्यक्त केले आहे.

## change In Name

I have changed my name from Kamalabai Shankar Sawant to Kamal shankar Sawant. As per maharstra Goverment Name change Gadget of 31st october to 6 november 2024, NO. M - 24257270.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

## जाहीर नोटीशीस शुद्धीपत्र

दि. १६ नोव्हेंबर २०२४ रोजीचे दैनिक कृषिवल मध्ये पान क्र. ५ वर आमचे मार्फत प्रसिद्ध झालेल्या जाहीर नोटीशीमधील मे. पुष्पम इन्फ्रा एल.एल.पी. यांचा पत्ता ६३५/१ब न्यू गजरा सोसायटी, बिबवेवाडी, पुणे ४११०३७ असा वाचण्यात यावा त्याचप्रमाणे परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे वाचण्यात यावे:

**परिशिष्ट :** तुकडी रायगड, पोट तुकडी तालुका अलिबाग व मे. दुय्यम निबंधक, अलिबाग यांचे स्थलसीमेतील तसेच जिल्हा परिषद अलिबाग-रायगड, तालुका पंचायत समिती अलिबाग, ग्रुपग्रामपंचायत धोकवडे हद्दीतील गाव मौजे धोकवडे येथील गट नंबर ६८४, ६९२, ६९३, ६९४, ६९५ व ६९६/१ चे मंजूर रेखांकनापैकी खालील वर्णनाच्या बिनशेती प्लॉट मिळकती:

| प्लॉट नंबर | यांसी सुसंगत गट नंबर | क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्वेस वा त्याबाजूस | दक्षिणेस वा त्याबाजूस | पश्चिमेस वा त्याबाजूस | उत्तरेस वा त्याबाजूस |
| २ | ६८४/२ | ५११ | प्लॉट नं.३ | गट नं.६९६/२ | गट नं. ७०० | अंतर्गत रस्ता |
| ३ | ६८४/३ | ५११ | अंतर्गत रस्ता | गट नं.६९६/२ | प्लॉट नं.२ | अंतर्गत रस्ता |
| ४ | ६८४/४ | ५११ | प्लॉट नं.५ | अंतर्गत रस्ता | अंतर्गत रस्ता | गट नं. ६४६ |
| ५ | ६८४/५ | ५११ | प्लॉट नं. ६ | अंतर्गत रस्ता | प्लॉट नं.४ | गट नं. ६४६ |
| ६ | ६८४/६ | ५११ | गट नं. ६४६ | अंतर्गत रस्ता | प्लॉट नं.५ | गट नं. ६४६ |
| ७ | ६८४/७ | ४९८ | प्लॉट नं.८ | प्लॉट नं. १० | अंतर्गत रस्ता | अंतर्गत रस्ता |
| ८ | ६८४/८ | ५११ | प्लॉट नं.९ | प्लॉट नं. ११ | प्लॉट नं.७ | अंतर्गत रस्ता |
| ९ | ६८४/९ | ५११ | ओपन स्पेस-१ | प्लॉट नं. १२ | प्लॉट नं.८ | अंतर्गत रस्ता |
| १० | ६८४/१० | ४९७ | प्लॉट नं.८ व ११चे भाग | अंतर्गत रस्ता | अंतर्गत रस्ता | प्लॉट नं.७ |
| ११ | ६८४/११ | ५११ | प्लॉट नं.१२ | अंतर्गत रस्ता | प्लॉट नं.१० व अंतर्गत रस्ता | प्लॉट नं.८ |
| १२ | ६८४/१२ | ५०९ | ओपन स्पेस-१ | अंतर्गत रस्ता | प्लॉट नं. ११ | प्लॉट नं.९ |
| १३ | ६८४/१३ | ५०८ | अंतर्गत रस्ता | प्लॉट नं. १४ | गट नं.६९६/२ | अंतर्गत रस्ता व अनबिल्डेबल क्षेत्र-३ |
| १४ | ६८४/१४ | ५०६ | अंतर्गत रस्ता | प्लॉट नं. १५ | गट नं.६९६/२ | प्लॉट नं. १३ |
| १५ | ६८४/१५ | ५२६ | प्लॉट नं. १६ व गट नं. ६९० | गट नं. ६९० | गट नं.६९१ | प्लॉट नं.१४(भाग)व अंतर्गत रस्ता |
| १६ | ६८४/१६ | ४८४ | ॲमेनिटी स्पेस नं.२ | गट नं. ६९० | अंतर्गत रस्ता व प्लॉट नं. १५ (भाग) | अंतर्गत रस्ता |
| १७ | ६८४/१७ | ५०५ | अंतर्गत रस्ता | प्लॉट नं. १८ | ओपन स्पेस-१ | गट नं. ६४६ |
| १८ | ६८४/१८ | ४७९ | अंतर्गत रस्ता | प्लॉट नं. १९ | ओपन स्पेस-१ | प्लॉट नं. १७ |
| १९ | ६८४/१९ | ४७१ | अंतर्गत रस्ता | अंतर्गत रस्ता | ओपन स्पेस-१ | प्लॉट नं. १८ |
| २० | ६८४/२० | ५०३ | अंतर्गत रस्ता | प्लॉट नं.२१ | ओपन स्पेस-२ | अंतर्गत रस्ता |
| २१ | ६८४/२१ | ४७७ | अंतर्गत रस्ता | प्लॉट नं.२२ | ओपन स्पेस २ | प्लॉट नं.२० |
| २२ | ६८४/२२ | ४७८ | अंतर्गत रस्ता व गट नं.६८३ | गट नं. ६८९ | ओपन स्पेस-२ | प्लॉट नं.२१ |
| २३ | ६८४/२३ | ४५९ | गट नं. ६७९ | प्लॉट नं. २४ | अंतर्गत रस्ता | अंतर्गत रस्ता व गट नं. ६४७ |
| २४ | ६८४/२४ | ४६६ | गट नं. ६७९ | गट नं. ६७९ | अंतर्गत रस्ता | प्लॉट नं. २३ |

येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक मिळकती त्यातील झाड, झाडोरा, दगड, माती, जल, तृण, काष्ठ, पाषाण, निधिनिक्षेप वगैरे सर्व तद्‌ंगभूत वस्तूंसहीत, तसेच मंजूर लेआऊट मधील जाण्यायेण्याच्या वहिवाटीच्या रस्त्याच्या व इतर तद्अनुषंगिक सर्व हक्कांसह दरोबस्त मिळकती काही एक राखून न ठेवता,

सदर जाहीर नोटीसीशीतील बाकीचा मजकूर आहे तसाच वाचण्यात यावा याची कृपया नोंद घ्यावी. येणेप्रमाणे शुद्धीपत्र.

दि. १६.११.२०२४

सही/-
**नवनीत मुथा, ॲडव्होकेट**
८, जय अपार्टमेंट्स, १०९८/१४,
मॉडेल कॉलनी, पोस्टऑफीस जवळ,
शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

## जाहीर नोटीस/सार्वजनिक सूचना

नि.७/ड
पु. ता. १८/१२/२०२४
ॲड. दिपक विश्वनाथ नागे

**अलिबाग येथील मे. जिल्हा न्यायाधिश-१ रायगड (मे. डॉ. श्रीमती निलकंठ श्रीष्टी सो.) यांचे न्यायालयात**

किरकोळ चौकशी अर्ज क्रमांक १८०/२०२४

श्रीमती संगिता अमोल आर्ते व इतर — अर्जदार
विरूध्द
निरंक — सामनेवाला

तमाम जनतेस तसेच सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात येते की,

वर नमुद विषयांकीत अर्जामध्ये अर्जदार क्रमांक १ श्रीमती संगिता अमोल आर्ते यांनी अर्जदार क्रमांक २ कु. पलाष अमोल आर्ते या अल्पवयीन मुलाची अर्जात नमुद मौजे तळाशेत, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक ९५ उपविभाग २ क्षेत्र २-१८-२० हे.आर. पैकी ०-७२-६६ हे.आर. आकार रू. २.९१ ही स्थावर मालमत्ता विकण्याच्या परवानगीसाठी पालक आणि पाल्य अधिनियम, १८९० चे कलम २९ तसेच हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६ चे कलम ८ अन्वये अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे.

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, या अर्जास कोणत्याही व्यक्तीला आक्षेप असल्यास, त्यांनी या सार्वजनिक सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून आक्षेप सादर करण्यासाठी या अर्जाची पुढील तारीख दिनांक १८/१२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता नेमण्यात आलेली आहे. सदर तारखेस व सदर वेळेत तुम्ही स्वत: अगर तुमचे प्रतिनीधी, वकील वगैरे यांचेमार्फत मे न्यायालयात हजर राहुन लेखी स्वरूपात आपले आक्षेप जिल्हा न्यायालय, अलिबाग येथे सादर करावेत. सदर कालावधीमध्ये कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यास, न्यायालयाकडून अर्जदारास पालकत्व व मालमत्तेची विक्री करण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेतला जाईल.

अलिबाग
दिनांक :-१६/११/२०२४

सही/- **लिपीक** **जिल्हा न्यायाधिश** **रायगड-अलिबाग**

सही/- **अधिक्षक** **जिल्हा न्यायाधिश** **रायगड-अलिबाग**

**This may be published in Newspapers and TV from the day following the last date for withdrawal of candidature and upto two days before the date of poll**

**Format C-1**

(for candidate to publish in Newspapers, TV)

**Declaration about criminal cases**

(As per the judgement dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Int3erest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

Name and address of candidate: Mahendra Sadashiv Thorve, At. Posari, Post. Tiware, Tal. Karjat, Dist.Raigad.

Name of political party : Shiv Sena

(Independent candidates should write "Independent" here)

Name of Election: Maharashtra Legislative Assembly Election - 2024

*Name of Constituency: 189 - Karjat

I, Mahendra Sadashiv Thorve (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents :

(A) Pending criminal cases

| Sr. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case (s) | Sections (s) of Acts concerned and brief description of offence (s) |
|---|---|---|---|---|
| 1 | Ulhasnagar Chopra Court | 318/2012 | Pending | IPC 420, 423, 464, 465, 466, 467, 468, 469, 471, 34 |
| 2 | High Court, Mumbai | 84/2009 | Pending | IPC 341, 307, 323, 147, 148, 149R/W34 |

(B) Details about cases of conviction for criminal offences

| Sr. No. | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence (s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|
| 1 | Not Applicable | Not Applicable | Not Applicable |

*In the case of election to Council of States or election to Legislative Council by MLAs, mention the
election concerned in place of name of constituency.

# पनवेलमध्ये होणार ११ दिवसाचा संविधान महोत्सव

। नवीन पनवेल । वार्ताहर ।

भारतीय संविधान स्वीकृती दिनाला २६ नोव्हेंबर २०२४ रोजी ७५ वर्ष पूर्ण होतील. याही वर्षी संविधान महोत्सव समितीच्या माध्यमातून शनिवारी (दि.२३) ते मंगळवारी ३ डिसेंबर असा ११ दिवसांचा संविधान महोत्सव साजरा करण्यात येणार आहे.

संविधान समजून सांगणाऱ्या बौद्धिक गोष्टी, कलाप्रदर्शन आणि विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, त्याचसोबत रोषणाई, सांस्कृतिक प्रबोधन, मान्यवरांची व्याख्याने असे विविध उपक्रम आयोजित करण्यात येतील. तसेच संविधान कट्टा, संविधान गार्डन, संविधान चौक आणि संविधान घराची प्रतिकृती संविधान महोत्सवामध्ये लावण्यात येणार आहे. या सगळ्याच्या मुळाशी भारतीय संविधानाची मुल्ये, अधिकार, आपली कर्तव्ये असतील. भारताचे संविधान आणि त्यातील मूल्ये आपल्या सर्वांसाठी उपलब्ध आहेत. आपल्याला या मूल्यांसोबत जगायचे आहे. तसेच त्यांचा अनुभव करायचा आहे. सर्व भारतीयांना आठवण करून देण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. संविधान महोत्सवाचे ठिकाण प्लॉट १, सेक्टर ५ गुरुद्वाराजवळ, नवीन पनवेल आहे. सर्व नागरिकांनी आप-आपल्या संस्था, संघटन आणि राजकीय पक्ष बाजूला ठेऊन भारतीय नागरिक म्हणून संविधान महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन समितीने केले आहे.

## जाहिर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहिर नोटीसद्वारे सुचित करणेत येते की, आमचे अशिल श्री. हार्दिक महेंद्र शाह यांचे वडील व श्रीम. ज्योतिका महेंद्र शाह यांचे पति कै. महेंद्र गोवर्धनदास शाह हे दिनांक २९/०५/२०१२ रोजी आजारपणाने मयत झालेले आहेत. कै. महेंद्र गोवर्धनदास शाह यांचे नावे खालील नमुद मिळकत आहे.

मौजे. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं. २२५/१, २२५/२, २२५/३, २२५/४, २२५/६ व २२५/८ब यामिळकती वरील ''गिरीसागर'' या इमारतीमधील, ए-विंग, तळ मजल्यावरील फ्लॅट नं. ए-१, क्षेत्र ४१५ चौ. फुट बिल्टअप ही फ्लॅट मिळकत. (ग्रामपंचायत नेरळ मिळकत क्र. १६५०/२ )

वर नमुद मिळकतीमध्ये कै. महेंद्र गोवर्धनदास शाह यांचे मृत्युपश्चात आमचे अशिल श्री. हार्दिक महेंद्र शाह व श्रीम. ज्योतिका महेंद्र शाह हेच एकमेव कायदेशिर वारस आहेत. तरी याबाबत कोणाचीही कुठलीही हरकत असल्यास पुराव्यासह ७ दिवसाच्या आत हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस तसा नाहरकत दाखला आमचे अशिलांना देणेत येईल. कळावे.

दि.१७/११/२०२४

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता- शॉप न. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता.कर्जत, जि.रायगड - ४१०१०१.
मोबाईल नं. ९३२५०६००३७
९०११२९२९८७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की. आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक सुनिता शर्मा यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे- शिंगढोळ तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्र. व उपविभाग /सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर. पॉ) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ५५/१ | एकुण क्षेत्र ०-९३-३० हे आर पॉ | ५-३१ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :१७/११/२०२४ **ॲड. निलेश कान्हू मोरे मोबा. ९८२२६९११०९**
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट ब्रांच

बँक ऑफ इंडिया Bank of India BOI

**बँक ऑफ इंडिया बिल्डिंग, पहिला मजला, २८, एस. व्ही. रोड, अंधेरी (प.), अंधेरी पश्चिम रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई– ४०० ०५८. दूर. क्र. २६२१०४०६/०७, ईमेल: asset.mnz@bankofindia.co.in**

**स्थावर मिळकतीच्या विक्रीसाठी ई–लिलाव**

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस्‌ ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या परंतुकांन्वये स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई–लिलाव विक्री सूचना.**

सर्वसामान्य जनता आणि विशेषत: खालील कर्जदार आणि हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, खालील वर्णिलेल्या मिळकती या बँक ऑफ इंडिया (तारण धनको) कडे गहाण/प्रभारित आहेत, ज्यांचा अन्वयीक/प्रत्यक्ष कब्जा बँक ऑफ इंडियाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, त्या संबंधित कर्जदार आणि हमीदार यांच्याकडून बँक ऑफ इंडियाकडे असलेल्या गहाण/प्रभारित तारण मत्तांसापेक्ष येथे खाली दिलेल्या तपशिलाप्रमाणे संबंधित थकबाकीच्या वसुलीसाठी ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे '' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्त्वाने विकण्यात येणार आहेत. राखीव किंमत आणि इसारा अनामत रक्कम प्रत्येक तारण मत्तेसमोर दर्शविण्यात आली आहे. विक्री येथे खालील पुरविलेल्या ई–लिलाव प्लॅटफॉर्ममार्फत निम्नस्वाक्षरीकारांद्वारे करण्यात येईल.

**सरफैसी ॲक्ट,२००२ अन्वये ई–लिलाव विक्री सूचना नी कर्जदार/हमीदार यांना सूचना** — **(रु.लाखांत) (ई–लिलावाची तारीख – २६.१२.२०२४)**

| अ. क्र. | खाते/कर्जदार/ हमीदारांचे नाव | मिळकतींचे वर्णन | राखीव किंमत/ इअर रक्कम | किमान बोली वाढ (लाखांत) | थकीत रक्कम (व्याज, दंड व्याज व खर्च वगळुन) (लाखांत) | सीईआरएसएआय सिक्युरिटी इंटरेस्ट/ ॲसेट आयडी | मिळकतीच्या ठिकाणी निरीक्षणाची तारीख/वेळ | संपर्क क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **रिलायन्स कन्स्ट्रक्शन सौ.कविता कदम (प्रोप्रायटर) श्री.आनंद कदम श्री सुधीर मल्होत्रा** | प्लॉट क्रमांक ११६, ११७, ११८, १२०, १२१,१२२,१२३,१२५,१२७ आणि १३० बेअरिंग सर्व्हे क्रमांक ३६/२ अ (२) आणि ३७/१ गाव कोथिंबे, ता. कर्जत, जि. रायगड. जमीन क्षेत्र: ५३३८० चौ. फूट. **(बँकेकडे प्रत्यक्ष कब्जा)** | **११९.५०/ ११.९५** | १.०० | ७२६.९९ | २००००२२७१३९६ | १७.१२.२०२४ दु. १२:३० ते दु. १:३० | ९७६९६४१८२८/ ८३४०४७४२९७ |

**ई–लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे :**

ई–लिलाव ''जे आहे जेथे आहे तत्वाने'', ''जे आहे जसे आहे तत्वाने'' आणि ''जे काही आहे तेथे आहे तत्वाने'' तत्वाने करण्यात येईल आणि तो ''ऑनलाईन'' करण्यात येईल.

लिलाव प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्याद विस्तारासह **२६.१२.२०२४ रोजी स. ११.०० ते सायं.** ५.०० भाप्रवे दरम्यान वेबसाईट **https://ebkray.in** मार्फत ऑनलाईन ई–लिलाव/बोली ने करण्यात येईल. ई लिलाव बोली प्रपत्र उद्धोषणा, ऑनलाईन लिलाव विक्रीच्या सामान्य अटी आणि शर्ती वेबसाईट मध्ये– **https://www.bankofindia.co.in**

बोलीदार **https://ebkray.in** ला भेट देऊ शकतात, जेथे बोलीदारांसाठी ''मार्गदर्शक तत्वे'' एज्युकेशनल व्हिडिओसह उपलब्ध आहेत. बोलीदारांनी पुरेशा आधी खालील औपचारिकता पूर्ण करायच्या आहेत:–

**टप्पा १:** बोलीदार/खरेदीदारांची नोंदणी : बोलीदारांनी त्यांचा मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी वापरुन नोंदणीकृत ई लिलाव पोर्टल **https://ebkray.in** वर नोंदणी करायची आहे. (स्टेप बाय स्टेप प्रक्रीया वर्णन पीडीएफ (बायर मॅन्युअल) पेजच्या खाली हेल्प ऑप्शन अन्वये होम पेज मध्ये डाऊनलोड करीता उपलब्ध आहे.)

**टप्पा २:** केवायसी पडताळणी : बोलीदारांनी आवश्यक केवायसी दस्तावेज अपलोड करायचे आहेत. केवायसी दस्तावेजांची ई–लिलाव सेवा पुरवठादारांकडुन पडताळणी करण्यात येईल (२ कामकाजाचे दिवस लागू शकतात).

**टप्पा ३:** त्यांच्या ग्लोबल इएमडी वॉलेटमध्ये इअर रकमेचे हस्तांतर : ई–लिलाव पोर्टलवरील जनरेट केलेली चलान वापरून एनईएफटी वापरुन फंडाचे ऑनलाईन/ऑफलाईन ट्रान्सफर करणे.

**टप्पा १ ते टप्पा ३** ई–लिलावाच्या तारखेपूर्वी पुरशा आधी बोलीदारांनी पूर्ण करायचा आहे. बोलीदार नोंदणी आणि बोली मार्गदर्शनासाठी बोलीदार **https://ebkray.in** ला भेट देऊ शकतात.

**ई बीक्रयचा हेल्पलाईन तपशील/संपर्क व्यक्ती तपशील:**

| ई बीक्रय हेल्पडेस्क क्रमांक | | | |
|---|---|---|---|
| नाव | ई–मेल आयडी | टीम | मोबाईल क्र. |
| हेल्पडेस्क क्रमांक | support.ebkray@psballiance.com | पीएसबी अलायन्स | ८२९१२२०२२० |
| धर्मेश अशेर | avp.projectmanager2@psballiance.com | पीएसबी अलायन्स | ९८९२२१९८४८ |
| सुधिर पांचाळ | sudhir@procure247.com | आय सोर्सिंग टेक्नॉलॉजी | ८१६०२०५०५१ |

१. इच्छुक बोलीदारांनी वैध इमेल पत्ता धारण केलेला पाहिजे. तपशिल आणि चौकशी करिता कृपया ईबीक्रय हेल्पडेस्क क्र. ८२९१२२०२२०, हेल्पलाईन ईमेल आयडी : **support.ebkray@psballiance.com** येथे संपर्क करावा.
२. प्राधिकृत अधिकाऱ्यांचे चांगले ज्ञान आणि माहितीनुसार मिळकत/तींवर बोजा नाही. तथापि इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी मिळकतीला बाधक दावे/हक्क/थकबाकी आणि लिलावासाठी ठेवलेल्या मिळकत/तींचे हक्क, बोजा संदर्भात त्यांची स्वतंत्र चौकशी करावी. ई–लिलावाची जाहिरात ही काही बँकेचे सादरीकरण किंवा वचन मानण्यात येऊ नये. मिळकत बँकेला ज्ञात किंवा अज्ञात विद्यमान आणि भविष्यातील बोजासह विकण्यात येईल. प्राधिकृत अधिकारी/तारण धनको कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे/हक्क/थकबाकीकरिता जबाबदार राहणार नाही. विक्रीसाठी ठेवलेल्या मिळकत/तींच्या संदर्भात ऑनलाईन बोली सादर केल्यानंतर कोणतेही दावे विचारात घेतले जाणार नाहीत.
३. इसारा अनामत रक्कम (इअर) ऑनलाईन बोली सादर करण्यापूर्वी आयबीएपीआय पोर्टल मध्ये नमूद आणि मार्गदर्शनानुसार बँक खात्यामध्ये आरटीजीएस/ एनईएफटी/फंड ट्रान्सफरमार्फत जमा करणे आवश्यक आहे.
४. केवायसी दस्तावेज म्हणजे १.ओळखीचा पुरावा (केवायसी) म्हणजेच व्होटर आयडी कार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स/पासपोर्ट इ. २. पत्रव्यवहाराकरिता विद्यमान पत्त्याचा पुरावा, ३. बोलीदाराचे पॅनकार्ड ४. बोलीदारांचा वैध ई– मेल आयडी/संपर्क क्रमांक इ.
५. निरीक्षणाची तारीख वरील नमुद संपर्क क्रमांकावर पूर्व वेळ ठरवून नमुद केलेल्या वेळी वरील कोष्टकात नमुद नुसार राहील.
६. संभाव्य बोलीदार आयबीएपीआय पोर्टल यांचेकडून ई–लिलावावरील ऑनलाईन प्रशिक्षण घेऊ शकतात.
७. बोलीदारांनी योग्य तपशिलासह विहित प्रपत्रात फक्त ऑनलाईन प्रक्रियेद्वारे मिळकतीकरिता बोली सादर करणे आवश्यक आहे.
८. बोलीदारांनी विक्रीच्या अटी आणि शर्ती वाचल्याचे आणि समजून घेतल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्यावर बंधनकारक राहतील.
९. बोली मूल्य आरक्षित मूल्यापेक्षा जास्त असावे आणि बोलीदार त्यांचा पुढील प्रस्ताव रु. ५ करोड पर्यंत राखीव किमतीकरीता रु. १.०० लाख (रुपये एक लाख) /रु. ५ करोड– रु. ९ करोड पर्यंत राखीव किंमतीकरीता रु. ५.०० लाख (रु. पाच लाख)/ आणि रु. ९ करोड पर्यंत राखीव किंमतीकरीता १०.०० लाख (रु. दहा लाख) च्या पटीत वाढवू शकतात.
१०. बोली सादर करण्यापूर्वी मिळकतीबाबत त्यांचे समाधान आणि निरीक्षण करणे ही इच्छुक बोलीदाराची जबाबदारी राहील.
११. यशस्वी बोलीदाराची इसारा अनामत रक्कम (इअर) विक्री मोबदल्याचा भाग म्हणून राखून ठेवण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांची इअर ई–लिलाव विक्री प्रक्रिया संपल्यावर परत करण्यात येईल.
१२. इसारा अनामत रकमेवर कोणतेही व्याज देय नाही. यशस्वी बोलीदाराने त्याच दिवशी किंवा जास्तीत जास्त पुढील दिवशी प्राधिकृत अधिकाऱ्यांनी बोली किंमत स्वीकारल्यानंतर त्वरित अगोदर जमा केलेल्या (इअरसह) खरेदी रकमेच्या २५% आणि विक्री किंमतीची उर्वरित विक्रीपासून १५ दिवसात वा पूर्वी जमा करणे आवश्यक आहे. लिलाव बँकेच्या निश्चितीअधीन राहील. कुठल्याही टप्प्यावर यशस्वी बोलीदाराने रक्कम जमा करण्यात कसूर केल्यास अगोदर जमा केलेले सर्व पैसे जप्त करण्यात येतील आणि मिळकत पुन्हा विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि कसूरवार बोलीदाराचा मिळकत/रकमेच्या संदर्भात दावा/हक्क राहणार नाही.
१३. संभाव्य पात्र बोलीदार ई– लिलावाच्या तारखेपूर्वी ईबीक्रय पोर्टल कडून ई–लिलावावरील ऑनलाईन प्रशिक्षण घेऊ शकतात. प्राधिकृत अधिकारी किंवा बँक हे इंटरनेट नेटवर्क प्रॉब्लेम/वीज जाणे किंवा कोणत्याही तांत्रिक अडचणी इ. करिता जबाबदार राहणार नाहीत. अशा आकस्मिक घटना टाळण्यासाठी बोलीदारांना ई–लिलाव प्रक्रियेत यशस्वीरित्या सहभागी होण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या योग्य उपकरणे, पॉवर बॅकअपची खात्री करण्याची विनंती करण्यात येत आहे.
१४. खरेदीदार मिळकतीच्या संदर्भात सरकारकडे देय सर्व वैधानिक देय, कर आणि दर आणि देणे दोन्ही वर्तमान आणि भविष्यातील समाविष्ट विक्री प्रमाणपत्र/ नोंदणी/प्रभार समाविष्ट मुद्रांक शुल्क सोसावे लागेल.
१५. खरेदीदारांनी प्रयोज्य टीडीएस समाविष्ट इतर सांविधानिक थकीत, नोंदणीकृत प्रभार, स्टॅम्प ड्युटी इ. सोसावे लागेल.
१६. उच्चतम प्रस्ताव स्वीकारणे प्राधिकृत अधिकारी/बँकेवर बंधनकारक नाही आणि त्यांना कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी ई–लिलाव तहकूब/पुढे ढकलणे/रद्द करणे किंवा लिलाव प्रक्रियेतून कोणतीही मिळकत किंवा तिचा भाग काढून घेण्याचे सर्वस्वी हक्क आणि स्वेच्छा निर्णय राहतील.
१७. विक्री प्रमाणपत्र फक्त खरेदीदार/अर्जदाराच्या नावे जारी करण्यात येईल आणि कोणत्याही अन्य नावाने जारी करण्यात येणार नाही.
१८. विक्री सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस्‌ ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अंतर्गत विहित नियम/अटीच्या अधीन राहील. विक्रीच्या अटी आणि शर्तींवर पुढील चौकशी तपशील काही असल्यास दिलेल्या संपर्क क्रमांकावरुन प्राप्त करता येईल.
१९. कोणीही सहभागी होणाऱ्यांनी स्वत:ची नोंदणी केल्यानंतर इअर जमा केली आहे आणि त्यानंतर त्यांची ई–बोली सादर केली नाही तर ते ईबीक्रय पोर्टल मध्ये विनिर्दिष्ट पद्धती मार्फत बोली रक्कम राखून ठेवू शकतात.
२०. प्रयोज्य असेल तेथे जीएसटी यशस्वी बोलीदाराने भरायचा आहे.

**कर्जदार/हमीदारांसाठी विक्री सूचना**

निम्नस्वाक्षरीकार बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी असल्याने, ही विक्री सूचना जारी करण्याचे व सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस्‌ ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि त्याअंतर्गत बनवलेले नियम ह्यांच्या अन्वये विक्रीचे सर्व अधिकार वापरण्याचे संपूर्ण अधिकार आहेत. वर वर्णन केलेल्या बँकेने मंजूर केलेल्या कर्जाच्या संबंधात व्याज आणि खर्च व आकार इ. सह थकीत रकमेचे प्रदान करण्यात तुम्ही कसूर केली आहे. म्हणून ६० दिवसांत उपरोक्त रक्कम अदा करण्यासाठी कलम १३(२) अन्वये बँकेने तुम्हा सर्वांना एक मागणी सूचना जारी केली. ६० दिवस संपूनही तुम्ही रकमेचे प्रदान केलेले नाही म्हणून, प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कलम १३(४) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून वरील परिशिष्टात सविस्तर वर्णन केलेल्या तारण मत्तांचा कब्जा घेतला. तुम्हाला याद्वारे सूचना देण्यात येते की, विक्रीच्या निर्धारित तारखेपूर्वी वरील रक्कम तुम्ही प्रदान करावी, कसूर केल्यास, मिळकतीची विक्री केली जाईल आणि शिल्लक थकबाकी काही राहिल्यास व्याज व खर्चासह तुमच्याकडून वसूल केली जाईल. कृपया ध्यानात ठेवावे की, मागणी सूचना, कब्जा घेणे, मूल्यांकन आणि विक्री इ. शी संबंधित सर्व खर्च, पहिल्यांदा निम्नस्वाक्षरीकार रोकड करतील त्या विक्री रकमेतून वजा केले जातील आणि विक्री किंमतीपैकी उर्वरित रक्कम तुमच्या वरील दायित्वात वर्ग केली जाईल. इसारा रक्कम जमा करण्यासहित त्याच्या अटी आणि शर्तींवर होणाऱ्या लिलावात सहभागी होण्याची मोकळीक तुम्हाला आहे.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १७.११.२०२४**

**सही/–**
**प्राधिकृत अधिकारी, बँक ऑफ इंडिया**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद.
गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या,
हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग
बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची
कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर
व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

■ शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय वधूवरांची नोंदणी. ५० शाखा–वेबसाईट नोंदणीसाठी–९२२६७६६१२९,९३७०५१७९४९

■ weight loss by 6 Natural Therapies (No madicine-No Exercise-No suppliment) wellness clinic-9226766129

■ नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे . अकाऊंटंट ( पेमेंट – १२००० ) हाऊस कीपर ( पेमेंट– ९५०० ) रिसेप्शन ( पेमेंट – १२०००) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२

■ भारतगैस वितरक मे.जे.बी.जगे ॲण्ड सन्स्, अलिबाग फुलटाईम/पार्ट टाईम कामासाठी मुले पाहिजेत संपर्क – ९३५९८८५६७६

■ सन स्टोन रीयल इस्टेट, साईना कॉम्प्लेक्स, चर्चच्यासमोर(ऑफीस, अलिबाग व आजुबाजुच्या गावामध्ये N.A.Plat बागायती प्लॉट भातशेती खरेदी व विक्री. संपर्क :८६६९००६९०२/९२७०८८८८०३

■ इलेक्ट्रिशन पाहिजे, २ ते ३ वर्षाचा अनुभव. ८८८८६०५२५९

■ वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत १० वी १२ वी पास/नापास पगार–१२००० रुपये १२ तास ड्युटी ठिकाण–बामणसुरे, चोंढी संपर्क – ९८२३५८५३२१

■ वर्कशॉमध्ये कामासाठी मुले पाहिजेत शिक्षण ITI कोणत्याही ट्रेडचा पगार– १२००० /महिना ८ तास ड्युटी संपर्क – ९०४९६५५५२३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

पान १ वरून

# डिझेलमाफियांसोबत दळवींचे कनेक्शन?

जहाज मुंबईमध्ये येत असताना त्यांच्या कॅप्टन अथवा अन्य व्यक्तींशी हातमिळवणी करून कमी भावाने त्यांच्याकडून डिझेल घेऊन मासेमारी करणाऱ्या बोटींना ते कमी दरात विकण्याचा गोरखधंदा सुरु आहे. यातून दिवसाला करोडो रुपयांची उलाढाल केली जाते. या बोटी मुंबई, रेवस, बोडणी, रेवदंडा, अलिबाग येथील आहेत. या बोटींना बाजारभावापेक्षा ३० ते ३५ रुपयांपेक्षा कमी म्हणजे ६५ रुपये किमतीने डिझेल विकला जातो. विद्यमान आमदार महेंद्र दळवी यांच्या कृपेने हे धंदे सुरु असल्याची माहिती समोर येत आहे.

राज किशोरदार पंडित तसेच राजू भाय या नावाने ओळखल्या जाणाऱ्या राजू पंडित मुंबईत कुलाबा, ससुन डॉक येथे बेकायदेशीर डिझेलचा गोरखधंदा करीत होता. त्याचे उरणमधील मोरा येथील पार्टनर नितीन कोळी तसेच रिचर्ड यांच्याबरोबरच हा धंदा सुरु होता. लहान मुलांच्या मदतीने डिझेल तस्करी करीत होते.

येलो गेट येथील तत्कालीन पोलीस अधिकारी रश्मी करंदीकर यांनी राजू पंडित व त्याच्याबरोबरच काम करणाऱ्यांविरोधात कारवाई केली. मोक्का अंतर्गत, दहशतवादी, चाईल्ड ॲक्ट १२० बी नुसार त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. राजू पंडित गेली अनेक वर्षे कारागृहात होता. तीन वर्षांनंतर त्याला जामीन मिळाला. रेवस मांडवा, बोडणी तसेच मोरा, उरण, करंजा या समुद्रकिनारी त्याला जाण्यास बंदी करण्यात आली होती. परंतु, हा धंदा सुरु ठेवण्यासाठी त्याने रायगड जिल्ह्याची निवड केली. डिझेल तस्करीमध्ये नवीन अस्तित्व निर्माण करण्यासाठी त्याने आमदार महेंद्र दळवी आणि बोडणी येथील गणेश कोळी यांच्याशी हात मिळवणी केल्याचे समजते. पनवेल येथील म्हात्रे नामक या व्यक्तीमार्फत आमदार दळवींसोबत राजू पंडित याने ओळख निर्माण केली. टँकरमागे ६० हजार रुपये असे एकूण सुमारे ४० ते ५० लाख रुपयांची टक्केवारीतून धंदा चालू ठेवण्याची चर्चा आहे. आमदार दळवी यांच्या कृपेने डिझेल तस्करीचा धंदा चालू असल्याचे बोलले जाते. दरम्यान, रेवदंडा बंदरासह मांडवा अन्य बंदरांवर खुलेआमपणे हा धंदा केला जात असल्याची चर्चा आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दळवी यांचा प्रचार सुरु आहे. विकासाच्या बाता त्यांच्याकडून मारल्या जात आहेत. प्रत्यक्षात मात्र बेकायदेशीर धंदा करणाऱ्यांना पाठबळ देऊन आपली आमदारकी टिकून ठेवण्याचा डाव त्यांनी सुरु केल्याची चर्चा आहे. गुन्हेगारांसोबत हितसंबंध जपून सत्तेचा दुरुपयोग करून अनधिकृत धंद्यांना पाठबळ देण्याचा प्रयत्न केला जात असल्याची चर्चा आहे. त्यामुळे गुन्हेगारांना हाताशी धरणाऱ्या आ. दळवी यांना अलिबाग विधानसभा मतदारसंघातील मतदार निवडून देतील का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

**शासनाचा महसूल बुडतो**

रायगडमधील रेवदंडा पोलीस ठाणे, तरणखोप पोलीस ठाणे पेण यांच्या अंतर्गतसुद्धा डिझेल तसकरीच्या गुन्ह्याची नोंद आहे. सद्यःस्थितीत रायगडमध्ये या टोळीवर वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात डिझेल तसकरीच्या गुन्ह्याची नोंद आहे. तरी पण ही टोळी खुलेआम फिरत आहे. बेकायदेशीर डिझेलचा धंदा करीत असून, त्यांच्यावर कारवाई होऊनसुद्धा त्यांना अटक झालेली नाही. हे बेकायदेशीर डिझेल तस्कर समुद्रामध्ये व खाडीमध्ये मच्छिमार करणाऱ्या मोठ्या बोटमालकांना कमी भावाने डिझेल देतात. त्यामुळे स्थानिक मच्छिमारी सोसायटीचे डिझेल कोणी घेत नसून, सोसायटी नुकसानात आहे व शासनाचा महसूल मोठ्या प्रमाणात बुडत आहे, असे सांगण्यात आले.

## डिझेल तस्करीविरोधात कोळी महासंघाची तक्रार

**अशी मागणी रायगड जिल्हा कोळी महासंघाकडून करण्यात आली होती. याबाबत जिल्हा अध्यक्ष टिवळेकर यांनी डीसीपी पोर्ट झोनला १८ जून २०२४ रोजी निवेदन दिले आहे.**

## राजू पंडित व कडीया यांच्यात वाद

**भरलेल्या त्यांच्या बोटी पकडल्या होत्या. राजू पंडित याच्या मदतीने काम करणाऱ्या कडीया उर्फ दिनेश गायकवाड याने डिझेल तस्करीचा स्वतंत्र धंदा सुरु केला आहे. वेगळी टोळी निर्माण केली आहे. त्यामुळे दोघांमध्ये अंतर्गत वाद सुरु आहे.**

# ...तर दिघी पोर्टच्या कामाला हात लावू देणार नाही

घटना मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. राज्यामध्ये ६४ हजार महिला बेपत्ता आहेत. अशी परिस्थिती महाराष्ट्रात कधीही नव्हती. आज या भगिनींना कोण कुठे घेऊन गेलं? त्याचा शोध लागत नाही. जे भगिनींचं संरक्षण करू शकत नाही, त्यांना राज्य चालवण्याचा अधिकार नाही, असे पवार म्हणाले.

आज खऱ्या अर्थाने तुमची बांधिलकी स्थानिक जनतेशी होती. जोपर्यंत सर्वसामान्यांपर्यंत विकास पोहोचत नाही,त्यांच्या प्रश्नांची पूर्तता होत नाही तोपर्यंत विकासाच्या नावावर मते मागण्याचा तुम्हाला अधिकार नाही. म्हणून येथील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी अनिल नवगणे यांना निवडून देण्याचं आवाहन शरद पवार यांनी केलं. श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार अनिल नवगणे यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितलं की या वेळेला श्रीवर्धन मतदारसंघ भ्रष्टाचारमुक्त झाला पाहिजे. यासाठी सर्वांनी कटिबद्ध व्हायला पाहिजे. आजपर्यंत आपल्या सोयीने आणि आपल्या स्वार्थासाठी राजकारण करण्यातच त्यांनी आयुष्य घालवलं. आपले राजकीय गुरू म्हणून बॅ. अंतुले यांचा उल्लेख वारंवार करणारे सुनील तटकरे यांनी त्यांच्या शेवटच्या काळात त्यांच्यावर जे आरोप आणि टीका टिप्पणी केली, त्यावेळी बॅ.अंतुले यांना जाणीव झाली की आपण यांना पुढे आणून फार मोठं पाप केलं. ज्या शरद पवारांनी त्यांना हवं ते दिलं तरीसुद्धा स्वतःच्या स्वार्थासाठी त्यांनी त्यांना सोडून दिलं. आज या मतदारसंघामध्ये कितीतरी दिग्गज असताना त्यांनी केवळ स्वतःच्या कुटुंबातील सदस्यांनाच उमेदवारी दिली, बाकी कोणत्याही समाजाचा त्यांनी विचार केला नाही.आज शरद पवारांना त्यांनी सोडलं उद्या अजित पवारांसोबत राहतील की नाही हे सांगू शकत नाही म्हणून माझं येथील जनतेला सांगणं आहे की अशा लोकांपासून सावध राहा. आज ते पक्षाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात फिरायला पाहिजे होतं परंतु ते श्रीवर्धन मतदारसंघात अडकून पडले आहेत. तुम्ही जर स्वतःला विकासपुरुष समजत असाल, तर तुम्हाला आज गाव गाव, वाडी, वस्ती, गल्लीत फिरण्याची वेळ का आली, असा सवाल नवगणे यांनी केला.

आज या मतदारसंघात हजारो कोटी रुपये पाण्याच्या योजनेसाठी आले आहेत; परंतु ९० टक्के योजना अजूनही बंद आहेत.गावच्या लोकांना विश्वासात न घेता स्वतःचा ठेकेदार पाठवायचा, पाईप टाकायचे काम पूर्ण करायचे नाही आणि कामाचे ८०-९० टक्के पैसे काढून घ्यायचे, हा यांचा कार्यक्रम, असा घणाघात अनिल नवगणे यांनी केला. श्रीवर्धन मतदारसंघातील ८० टक्के लोकं रोजगारासाठी शहराकडे जातात. एखाद्या खेडेगावात प्रचारासाठी गेलो तर तेथे वयोवृध्द माणसं आपल्याला भेटतात. सर्व तरुण वर्ग आज मुंबईमध्ये रोजगारासाठी आहे. ते श्रीवर्धन मतदारसंघामध्ये रोजगार तयार करू शकले नाहीत. मी आज तुम्हाला सांगू इच्छितो जर मला संधी दिली तर येथील रोजगाराच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करेन. आपल्या विभागात सुसज्ज अशी रुग्णालयाची व्यवस्था नाही, काही मोठे शासकीय दवाखाने आहेत; परंतु तेथे कर्मचारी नाहीत. दिघी पोर्टच्या अनुषंगाने अदानी समूहाकडून या विभागात बांधण्यात येणारे मोठं रुग्णालय तटकरे यांनी रोह्यात नेलं. पोर्टसाठी जमीन जाते श्रीवर्धन, म्हसळा, मुरुड तालुक्यातील; परंतु येथील जनतेच्या आरोग्यासाठी हक्काचं असणारं रुग्णालय रोह्यात? हे रुग्णालय मी आपल्या विभागात आणण्यासाठी नक्कीच पुढाकार घेईन.

राज्यामध्ये महाविकास आघाडीची सत्ता येणार आहे, त्यामुळे इथला आमदारसुद्धा महाविकास आघाडीचा असला पाहिजे. यासाठी मला तुमच्या आशीर्वादाची गरज आहे, असं आवाहन नवगणे यांनी जनतेला केलं. श्रीवर्धन विधानसभा काँग्रेस अध्यक्ष विजय तोडणकर त्याचबरोबर राष्ट्रवादी शरद पवार गटात नुकताच प्रवेश केलेले शामकांत भोकरे यांनीसुध्दा आपलं मनोगत व्यक्त केलं. याप्रसंगी माजी आमदार तुकाराम सुर्वे, मुस्लिम समाजाचे नेते श्रीवर्धन, म्हसळा तालुक्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. वंचित बहुजन आघाडी रायगड जिल्हा अध्यक्ष रवींद्र चव्हाण व अनमोल जीवन सामाजिक ट्रस्ट यांच्याकडून अनिल नवगणे यांना बिनशर्त पाठिंबा जाहीर करण्यात आला.

# आमदारकी पुन्हा खेचून आणणार

पण, महाराष्ट्रातल्या रायगड जिल्ह्यातील आगऱ्यांच्या नादी लागू नका. ही भूमी आगऱ्यांची आहे. इथे आगरीच जमणार आणि इथला आमदारही आगरीच होणार. आगऱ्यांना हिणवण्याचं किंवा तुच्छ लेखण्याचे कोणी काम करत असेल तर ते चालणार नाही. असे सांगून आपले चारही उमेदवार विधानसभेत दिमाखात पाठवायचे आहेत. प्रीतम म्हात्रे, जे.एम. म्हात्रे आणि कार्यकर्त्यांनी या निवडणुकीसाठी जोरदार तयारी केलेली आहे.

अलिबाग, पेण, पनवेलमध्ये चित्रलेखा पाटील, अतुल पाटील आणि बाळाराम पाटील यांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. उद्या होणारी तिसरी मुंबई या ठिकाणीचे जे दलाल आहेत, त्यांनी आपल्याला फसवले आहे. तिसरी मुंबई येत आहे. तिचे संरक्षण झाले पाहिजे. त्यासाठी आपल्याला चारही उमेदवार विधानसभेत पाठवायचे आहेत, असे आवाहन जयंत पाटील यांनी केले. यावेळी व्यासपीठावर शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. या सभेला उरणच्या नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती.

# नागावमध्ये शिंदे गटाची गुंडगिरी

बॅनर काढून टाक असे बोलल्यानंतर रोहन नाईक यांचा मित्र विलास आंब्रे यांच्या जागेमध्ये बॅनर लावण्याची परवानगी असल्याचे पत्र रोहन नाईक यांनी शिंदे गटातील कार्यकर्त्यांना दाखवले. या गोष्टीचा शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांना राग आला. यामुळे शिंदे गटातील चेतन शेवडे, अंकिता शेवडे आणि अनिकेत थळे यांनी रोहन नाईक याला शिवीगाळी केली. यावेळी रोहन नाईक यांच्यासोबत असणाऱ्या एकाला अंकिता शेवडे, अनिकेत थळे आणि संजय कर्णेकर यांनी मारहाण करून दमदाटी केली. यामुळे घाबरून रोहन नाईक यांनी लावलेला बॅनर काढून घेत थेट अलिबाग पोलीस ठाणे गाठले. रोहन नाईक यांनी चेतन शेवडे, अंकिता शेवडे, अनिकेत थळे आणि संजय कर्णेकर यांच्याविरोधात तक्रार दाखल केली असून अलिबाग पोलीस ठाण्यात या चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आमटेमजवळ बस पलटी

पेण तालुक्यातील कोलेटीवाडीचे पुढे आमटेमनजीक आली असता चालक विनोद हळदणकर यास झोपेची डुलकी लागली. त्यामुळे बस ही रस्त्याच्या खाली जाऊन पलटी होऊन अपघात झाला.

या अपघातात बसमधील रुपाली सखाराम धुमाल, सखाराम गंगाराम धुमाल, अनिकेत सखाराम धुमाल (तिन्ही रा. कांजुरमार्ग मुंबई ईस्ट), वंदना वसंत खोचाडे (रा. अंधेरी मुंबई), सुमित अनंता बाणे, (रा. विरार मुंबई), समर्थक सचिन जाधव (रा. अंधेरी मुंबई), वसंत तानु खोचोडे (रा. अंधेरी मुंबई), रिहान सिराज पटणी (रा. अंधेरी मुंबई), अनिल सोनी गावकर (रा. नालासोपारा), सत्यवान काशिराम पगारे (रा. वडाला मुंबई), प्रमोद मधुकर कांबळे (रा.वडाळा मुंबई), प्राजक्ता प्रमोद कांबळे (रा.वडाळा मुंबई), मयुरेश प्रमोद कांबळे (रा.वडाळा मुंबई), विनायक आत्माराम घडशी (रा. घाटकोपर, मंबई), विनोद चंद्रकांत हळदणकर (रा. चांभारभाटीवाडा सिंधुदुर्ग), मंगेश भगवान नाकटे (रा. घाटकोपर मुंबई), पुरुषोत्तम गणपत कदम (रा. अंधेरी मुंबई), संकेत अनिल तारी (रा. बोंडगाव सिंधुदुर्ग), मनोहर शंकर आंबेरकर (रा. बोरीवली मुंबई), प्रतिभा कृष्णा यादव (रा. सडेवाल घोटन रत्नागिरी), अमिता अनंत बाणे (रा. विरार), प्रसाद राजेंद्र हांडे (रा. नालासोपारा), जयश्री जयवंत आंबेरकर (रा. नडगिरे सिंधुदुर्ग), स्वप्नील संजय यादव (रा. विरार), नकुल रामचंद्र सागवेकर (रा. कांजुरमार्ग मुंबई), सुनिता सिध्दार्थ कोंडकर (रा.वडाळा, मुंबई) हे प्रवासी जखमी झाले आहेत.

या अपघाताचे वृत्त समजताच वडखळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे आपल्या सहकाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्यांनी किरकोळ जखमींना इतर वाहनाने दवाखान्यात दाखल केले. उपचारानंतर बाकीच्या प्रवाशांना मुंबई व नालासोपारा व इतर ठिकाणी पाठवण्यात आले आहेत. तर, तीन प्रवाशांवर जेएसडब्ल्यू कंपनीच्या संजीवनी रुग्णालयात उपचार केले जात आहेत.

या अपघाताप्रकरणी अनिकेत सखाराम धुमाळ (कांजूरमार्ग) यांनी विनोद चंद्रकांत हळदणकर (रा. चांभारभाटीवाडा, देवगड जि. सिंधुदुर्ग) यांच्या विरोधात वडखळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार सोनावळे करीत आहेत.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१७ नोव्हेंबर**

१) श्री. प्रकाश पांडूरंग सप्रे
मु.थळ, अलिबाग, १७-११-१९४७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# साप्ताहिक राशिभविष्य दि. १७ ते २३ नोव्हेंबर २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## विचारपूर्वक निर्णय घ्या

**मेष :** हा सप्ताह मेष राशीधारकांना खर्चात वाढ होणारा जाणार आहे. व्यापार करणाऱ्या व्यक्तींना साह्य न मिळाल्यामुळे त्रास सहन करावा लागेल. जो चिकाटी धरून राहील, त्याचे नशीब फळफळणार आहे. कोणतीही कृती आतताईपणे न करता विचारपूर्वक निर्णय घ्या. या आठवड्यात आपल्यावर जबाबदऱ्या येणार आहेत. या जबाबादऱ्या पार पाडताना आपला कस लागणार आहे. त्यामुळे आपल्याला झेपतील इतकीच जबाबदारी स्वीकारा. आपल्यात असणारी सकारात्मक बाजू आपल्याला अडचणी सोडवण्यास मदत करतील. सरकारी क्षेत्रात असणाऱ्या व्यक्तींना मान-सन्मान मिळणार आहे. कुटुंबात वाद-विवादाचे कारण बनू नका. देवदर्शनाला जाण्याचा बेत आखला असेल तर ही इच्छा आता फलद्रूप होणार आहे. आठवड्याच्या शेवटी राजकारणात आपल्याला मानसन्मान मिळणार आहे. व्यापारात शेवटी शेवटी फायदा होणार आहे. **महिलांना-** महिलावर्गाचा वेळ दुसऱ्यांची भांडणे सोडवण्यात जाणार आहे. मात्र, अशावेळी सत्याची बाजू घ्या त्यामुले यश प्राप्त होईल, कोणीतरी आपली कानउघडणी करण्याची गरज निर्माण होईल.आर्थिक लाभासाठी अमावस्येला श्री सूक्त वाचने गरजेचे आहे. **शुभदिनांक-** १८,१९.

## व्यवसायात यश मिळेल

**वृषभ :** हा साप्ताह वृषभ राशीसाठी उत्साहपूर्ण असणार आहे. नोकरी-धंद्यासाठी केलेला प्रवास यशस्वी होणार आहे. आपण केलेला लहान व्यवहारही फायदा देणारा ठरणार आहे. व्यवसायात एखादे लक्ष प्राप्त होण्याचा संभव आहे. महत्त्वाच्या कामासाठी आपली निवड होऊन आपल्यावर जबाबदारी सोपवली जाणार आहे. आपण मेहनतीने ती यशस्वी करू शकाल. प्रॉपर्टीबाबत व्यवहार होण्याचा संभव आहे. योग्य तो निर्णय घेण्यास हरकत नाही. प्रेमविवाहात बदल करण्यास बोलणी होऊ शकतात आपण ताणून धरू नका नाहीतर आपला तोटा होऊ शकतो. भावनेच्या भरात घेतलेला निर्णय चुकीचा असू शकतो. मनोरंजनासाठी जास्त खर्च करू नका विवाहितांना घराच्या जबाबदाऱ्या पार पडताना नाकी नऊ येतील. थोडा संयम अधिक काळ धरणे आवश्यक राहील. इतर दिवस चिंतेत टाकणारे नसले तरी अमावस्या मात्र घरातील व्यक्तींसाठी काळजी वाढवणारी ठरणार आहे. संततीबाबतही चिंता असू शकते. **महिलांना :** आपल्या पूर्वजांचे स्मरण करून तो दिवस त्यांच्यासाठी देणे आपल्यासाठी हितकारक असेल. पूर्वजांसाठी अमावास्येला पितृपीडा स्तोत्र वाचने हितकारक आहे. **शुभदिनांक-** १७,१८.

## अनावश्यक खर्च टाळावा

**मिथुन :** या राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपण आपल्या खर्चावर योग्य नियंत्रण ठेवल्यास बऱ्याच गोष्टी साध्य करता येतील. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्चावर मात्र कटाक्षाने निर्बंध ठेवणे हितकारक राहील. आपल्या रागावर नियंत्रण ठेवणे योग्य राहील, आपला राग एकदम बाहेर पडणारा असतो, त्या वाफ जाईपर्यंत थांबणे हितकारक असेल. त्यासाठी वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. आर्थिक गुंतवणूक सध्या नको. व्यवहारात चढ-उतार संभवतात. तरीही हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल. त्यामुळे आपले काम थांबवू नका, नोकरदारांना काहीसा दिलासा मिळेल. ५० पुढील व्यक्तींनी प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. एका बाजूने आपल्याला जोडीदाराची उत्तम साथ मिळणार आहे. कलाक्षेत्राला उत्तम हा कालावधी उत्तम असून, पितरांचे स्मरण करणे महत्त्वाचे आहे. **महिलांना :** महिलांना, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळणारा कालावधी आहे. एखादा सत्कारही होण्याचा संभव आहे. प्रवासाचे योग संभवतात, आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे, म्हणजे इतरांची नाराजी होणार नाही. **शुभदिनांक-** १९,२०.

## मेहनतीचे फळ मिळेल

**कर्क :** या सप्ताहात कर्क राशीधारकास त्याने घेत असलेल्या श्रमाचा योग्य परतावा मिळाल्याचे समाधान मिळू शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्याची पथ्ये पाळा. उष्णतेच्या व डोळ्यांच्या विकारांबाबत सावध राहा. जोडीदाराची योग्य साथ मिळणार असल्याने एखादे मोठे काम करण्यास हरकत नाही, आपण आपल्या उद्योग-व्यवसाय क्षेत्रात काही बदल करणे महत्त्वाचे ठरणार आहे, पर्यायाने आपणावर येणाऱ्या आव्हानांना आपण सहजपणे सामोरे जाऊ शकाल. इतरांच्या मतांना जास्त महत्त्व न देता आपणास योग्य वाटणाऱ्या गोष्टींना प्राधान्य द्या. सरकारी नियमांचे पालन करा. विवाहेच्छुकांच्या आशा पल्लवित होतील. प्रलोभनांपासून दूर राहा. आपल्याला नोकरी-व्यवसायात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. आपल्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळू शकेल. शेतीविषयक कामांना गती मिळेल. **महिलांना-** आपल्या स्वभावातील हेकेखोरपणावर मात्र प्रतिबंध करा. थोड हट्टीपणा बाजूला ठेवून जोडीदाराच्या मनाप्रमाणे वागा, घरातील वातावरण बदलून जाईल. एखादे शुभकार्य करण्याबाबत ठरवले जाईल. **शुभदिनांक-** २१,२३.

## जोडीदाराची साथ मिळेल

**सिंह :** या राशीसाठी या सप्ताहात ग्रहांची उत्तम साथ मिळणार असल्याने आपण अपेक्षित गोष्टी साध्य करू शकाल. नोकरदारांनी मात्र वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. विद्यार्थ्यांना अध्ययनात अपेक्षित यश मिळू शकेल. विवाहेच्छुकांच्या आशा-आकांक्षा पल्लवित होतील. कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. प्रकृतीबाबत मात्र सावधानता बाळगा, विशेषतः उष्णतेच्या विकारांबाबत सावध राहा. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने करा. आर्थिक बाजू सांभाळा. अनावश्यक खर्चापासून लांब राहा. बचतीबाबत सजग राहा. जोडीदाराची साथ मिळेल. पदवीधारकाने अभ्यास सुरू करावा. प्रवास संभवतो. घरात एखादे शुभकार्य होण्याची शक्यता राहील. शेतीविषयक कामांना गती मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. कौटुंबिक वादविवाद मात्र कटाक्षाने टाळण्याचा प्रयत्न करा. राजकीय क्षेत्रात जम बसवू शकाल. कुटुंबाकडून अपेक्षित सहकार्य मिळेल. गायीला अमावस्येला पोळी घाला. **महिलांना-** विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्यावे लागेल. घरात काही किमती वस्तूची खरेदी कराल. शुभ मनोरंजनामध्ये जागरण टाळणे हितावह आहे. **दिनांक-**१९,२२.

## कार्यात सफलता लाभेल

**कन्या :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता ते आपणास पुष्कळशा बाबतीत साथ देणारे असल्याने आपले कार्य सफल करू शकाल. विरोधकांची धास्ती बाळगण्याचे कारण नाही, ते नामोहरम होतील. आपल्या कामकाजात अधिक लक्ष देऊन ते पार पाडण्याचा प्रयत्न करा. सामाजिक क्षेत्रात आपला दबदबा वृद्धिंगत होईल. सरकारी नियमांचे पालन करा. व्यवसायात प्रगतीची संधी मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रलोभने टाळा. आठवड्याच्या शेवटी महत्त्वाची कामे हाती न घेतल्यास, पुढे ढकलल्यास सर्व दृष्टीने हितकारक ठरू शकेल. कामाची जबाबदारी वाढण्याची शक्यता राहील. कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. संगणक व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना प्रगतीची संधी मिळेल. आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगा. मोठी गुंतवणूक करण्याचे टाळा. अमावास्येला प्रवास टाळावा. **महिलांना-** बाहेर पडताना तब्बेतीची पूर्ण काळजी घेणे आवश्यक आहे. थंड पदार्थ अजिबात घेऊ नये, त्यापासून लांब राहणे उत्तम ठरेल. संततीकडून खुशखबर मिळणार आहे. लांब फिरण्यास जाण्याचे नियोजन केले जाईल. तीर्थयात्रा करण्यास हरकत नाही. **शुभदिनांक-**२०,२३.

## गुरुकृपेचा लाभ घेता येईल

**तुळ :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्या मेहनतीलाच यशाची झालर प्राप्त होण्याची शक्यता असल्याने त्याचा योग्य उपयोग करणे सर्व दृष्टीने ठीक राहील. नोकरदारांनी आपल्या वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक राहील. आपल्या श्रमाला योग्य न्याय दिला जाईल. कौटुंबिक वातावरण वादाच्या प्रसंगाने बिघडणार नाही याची दक्षता घ्या. सरकारी कर्मचारिवर्गाने नको त्या प्रलोभनात अडकू नये. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने पाळा. आपण प्रत्येक बाबतीत सकारात्मक विचाराने वागण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. बढती व बदलीबाबत विचार होऊन नोकरदारांना दिलासा मिळू शकेल. आर्थिक बाबतीत तज्ज्ञांचा सल्ला घेतल्याशिवाय व्यवहार करू नये. विशेषतः मुलांच्या कलागुणांना चांगला वाव मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. अमावस्या भाग्यकारक आहे. **महिलांना-** धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे योग्य राहील. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्याची पथ्ये पाळा व नियमित व्यायाम करा. कोणाशीही नाराजी पत्करू नका. **शुभदिनांक-** १७,१८.

## सप्ताहातील वातावरण उत्साह राहील

**वृश्चिक :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता एकूण वातावरण चांगले राहिल्याने आपणास आनंद घेता येईल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास गैरसमजापासून दूर राहू शकाल. गोड बोलून आपला कार्यभाग साधण्याचे धोरण स्वीकारणे योग्य राहील. सरकारी नियमांना प्राधान्य द्या व ते कसोशीने पाळा. आपण कार्यक्षेत्राबाबत दुसऱ्यांवर विश्वास न ठेवता स्वतः जातीने लक्ष घातल्यास आपण आपले उद्दिष्ट गाठू शकाल. कामाचा उत्साह वाढला तरी आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. मित्रमंडळी व आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. हाती घेतलेल्या कामांना मार्गी लावण्याचा प्रयत्न करा. घरगुती वातावरणात गोडवा येऊ शकेल, बाहेर फिरताना आपल्या किमती वस्तू सांभाळणे गरजेचे राहील. अमावस्येला दुपारी माशांना खाण्यास देणे भाग्यकारक आहे.

**महिलांना-** मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. **शुभदिनांक-** १९,२०.

## नोकरदारांना बढतीचे योग

**धनु :** या राशीसाठी या सप्ताहात आपण संयम व जिद्द यांचा योग्य वापर केल्यास आपले ध्येय गाठू शकाल. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने वेळीच अनावश्यक खर्च टाळा. नोकरदारांना बढती मिळू शकेल. आर्थिक बाजू ठीक ठेवता येईल. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. वरिष्ठांशी व सहकाऱ्यांशी बोलताना सावधपणे वागावे. हितशत्रूंबद्दल चिंता करू नका, त्यांना गप्प बसवू शकाल. आवश्यक तेव्हा आपल्या बुद्धिकौशल्याचा उपयोग करा. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण काळ, काम व वेग यांचे योग्य गणित सांभाळल्यास हा आठवडा चांगला घालवू शकाल. कलात्मक आनंद देणाऱ्या कामात गुंतवून घेतल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आपल्या अहंकारावर मुरड घातल्यास हितकारक ठरू शकेल. पण, आपण आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा. अमावस्या असताना घरात वाद घालू नका. **महिलांना-** हाती घेतलेल्या कामांचा निपटारा करा. आर्थिक बाजू ठीक राहील. घरातल्यांची मर्जी राखता येईल. आर्थिक व्यवहारात मात्र गुंतून जाणार नाही, याची दक्षता घ्या. **शुभ दिनांक** -२१,२२.

## बौद्धिक क्षेत्राला उत्तम वाव

**मकर :** हा सप्ताह मकर राशीसाठी प्रलोभन समोर आले तरीही नको त्या प्रलोभनात अडकून जाऊ नका. बौद्धिक क्षेत्राला उत्तम वाव मिळेल. व्यवसाईक लाभ घेऊ शकतील, प्रकृतीबाबत आपण चालढकलपणा न करता पथ्ये पाळा. नियमित व्यायाम करा, मसालेदार पदार्थ खाण्याचे व चहा टाळा. आपण अध्ययनातील क्षेत्रात कठोर परिश्रम व सातत्य अंमलात आणल्यास आपल्या यशाचा आलेख उंचावू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारल्यास उत्तम राहील. वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. राजकीय व्यक्तींचे राजकीय क्षेत्रात वर्चस्व राहू शकेल. काही भाग्यवंतांना दोनाचे चार हात होण्याची संधी मिळू शकेल, निर्णय मात्र विचारपूर्वक घ्यावा. आपण सर्व बाबतीत व कार्यक्षेत्रात शांततेने परिस्थिती हाताळल्यास आपणास अपेक्षित यश मिळू शकेल. शनिदेव किंवा मारुतीला अमावस्येला तेल वाहणे. **महिलांना-** आपणास प्रोत्साहित करणाऱ्या घटकांना जाणून घ्या व मग त्यांचा अवलंब करा. आर्थिक बाजू ठीक राहील. शेतीविषयक कामकाजांना चालना मिळेल. संततीच्या प्रकृतीबाबत आपण अधिक दक्ष राहा, डॉक्टरांचा सल्ला घ्या. **शुभ दिनांक-** १७,२३.

## आर्थिक व्यवहार जपून करा

**कुंभ :** या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत संयमाने वागल्यास व त्याप्रमाणे कृती केल्यास हा सप्ताह चांगला जाऊ शकेल. कामकाजात निर्माण होणाऱ्या प्रश्नांना शांतपणे व संयमाने हाताळल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य होऊ शकतील. प्रत्येक गोष्टींचा आस्वाद घेताना त्याचा अतिरेक होणार नाही याची दक्षता घ्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. नोकरदारांना व व्यावसायिक क्षेत्राला चांगला काळ राहील. हितशत्रूंची चिंता करण्याचे कारण नाही, ते गप्प बसतील. आपण आपला आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारल्यास हितकारक ठरू शकेल. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. साहसी कृत्ये कटाक्षाने टाळावीत. विरोधकांच्या हालचालींवर कडक नजर ठेवावी, त्यांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. विद्यार्थीवर्गाला अध्ययनात यशाची अपेक्षा ठेवू शकाल. **महिलांना-** जिद्द व आत्मविश्वासाने नियोजित कामे पार पाडा. सध्या मोठी गुंतवणूक टाळावीत. आरोग्याबाबत हलगर्जीपणा करू नका, जिवलगाकडून भेटवस्तू मिळेल. **शुभदिनांक-** १८,२०.

## कामात दगदग वाढेल

**मीन :** या सप्ताहात मीन राशीधारकांनी प्रकृतीची काळजी घेणे गरजेचे राहील. आठवड्याच्या शेवटी स्थिती सामान्य होणार आहे, तोपर्यंत दम धरणे क्रमप्राप्त राहील. घराबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतात. कोर्ट कचेरीही होऊ शकते. आपण कितीही काम केलेत तरी आपल्या अधिकारी वर्गाचे समाधान होणार नाही. घरातही अशीच स्थिती राहील. कामात दगदग वाढणार आहे. स्थावर मालमत्तेची कामे करताना विचारपूर्वक करावीत. हातचे सोडून पळत्याच्या पाठी जाऊ नका, कामकाज नसलेल्यांना अचानक काम हाती येणार आहे, त्यामुळे हाती पैसा खेळू शकेल. कमी पैसे असले तरी हातातील संधी सोडू नका. आपल्या जिवलगासोबत वेळ घालवण्याची संधी उपलब्ध होईल, योग्य त्या रीतीने त्याचा फायदा घ्या. नोकरदारवर्गाने मोठ्या मंडळींबरोबर गोड बोलून राहावे, जुन्या समस्या व चिंता मिटणार आहेत. अमावस्येला श्वानाला खाण्यास द्या. **महिलावर्ग-** घरात एखादे मंगलकार्य होणार आहे, त्याची तयारी करावी लागेल. आपल्या परिश्रमाचे योग्य फळ मिळणार आहे. नवीन नोकरी असणाऱ्यांना वातावरण चांगले मिळणार आहे. कुटुंबात एखाद्या चांगल्या कार्याचा योग आखला जाईल. जास्त तेलकट पदार्थ खाऊ नका, त्रास होऊ शकतो. **शुभदिनांक -** १९,२३.

# सोनम वांगचुक: लडाखी लोक का करत आहेत आंदोलन

**लडाख हा तथाकथित विकासाच्या अनुषंगाने आजपर्यंत अलिप्त असाच प्रदेश होता. विकासाच्या नावाखाली ज्या पद्धतीने हिमालयाच्या कुशीत बसलेल्या हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, सिक्कीम आदी राज्याची अलिकडील भयाण परिस्थिती पाहिल्यास आपणास विकास की विनाश हा कन्सेप्ट क्लिअर होईल. म्हणून आपण आता हिमालयाच्या कुशीत वसलेल्या विकसित राज्यांची परिस्थिती पाहू.**



संजय टाकळ गव्हाणकर

दिल्लीच्या सत्ताधीशांच्या परिभाषेनुसार हिमालयाच्या कुशीत वसलेल्या ज्या राज्यांमध्ये सर्वाधिक वीज प्रकल्प आहेत, हायवे आहेत ती राज्य म्हणजे विकसित व प्रगत आहेत. ही केंद्रीय सत्तेची विकासाची परिभाषा पूर्वी होती व आत्ताही आहे. हिमालयाच्या कुशीत असलेल्या राज्यामध्ये जलविद्युत प्रकल्प उभारणे हे पर्यावरणाचे अनुषंगाने हानिकारक असल्याचे तज्ञांनी व या क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या संस्थांनी अगोदरच व्यक्त केले होते. तरीपण तज्ञांच्या मताचा विचार न करता केवळ काही मूठभर समाजाचा ऐशोराम, लाड पुरवण्यासाठी हे वीज प्रकल्प उभारण्यात आले. या वीज प्रकल्पाचा लाभ स्थानिक राज्यांना होण्यापेक्षा देशातील प्रमुख इतर शहरांना झाला. विशेषत: हिमाचल प्रदेशातील जलविद्युत प्रकल्पाचा लाभ हा चंदीगड व दिल्ली या प्रमुख उत्तरेतील शहरांसाठी झाला. या वीज निर्मितीतून कोणतीही राष्ट्रीय संपत्ती निर्माण झालेली नाही. हिमनद्यांचा जलप्रवाह वीज निर्मिती प्रकल्पासाठी बदलणे व अडवणे ही पर्यावरणाच्या अनुषंगाने अनैसर्गिक बाब असून त्याचे गंभीर दुषपरिणाम भविष्यात दिसतील. हे ज्यावेळी असे जलविद्युत प्रकल्प हिमालयाच्या कुशीमध्ये कार्यान्वित होत होती. त्यावेळेस पर्यावरण तज्ञ व भूगर्भ तज्ञांनी मत व्यक्त केले होते. याकडे केंद्रीय सरकारने दुर्लक्ष केल्याने त्याचे दुष्परिणाम कसे समोर आले त्या काही महत्त्वाच्या मानवनिर्मित नैसर्गिक आपत्तीच्या घटना पहिल्या तर आपणास याची भीषणता व भविष्यकाळातील आपत्तीची कल्पना येईल.

**१) सन २०२३ मध्ये**

उत्तराखंड येथील बद्रीनाथ येथील झालेली भारतातील भीषण नैसर्गिक आपत्तीपैकी एक आपत्ती होय. ग्लेशियर वितळल्याने मंदाकिनी नदीला महापूर आला या महापुरामध्ये अंदाजे सहा हजार पेक्षा अधिक लोक वाहून गेले या महापुरामुळे सुमारे ३०० ते ४०० कोटी रुपयांची वित्तहानी झाली.

**२)** ही घटना सात फेब्रुवारी २०१९ ची आहे उत्तराखंडातील चमोरी जिल्ह्यातील रॉयल्टी शिखर पर्वतरांगातील एक महाकाय हिमनग कोसळला. हा हिमनग कोसळल्यामुळे ऋषीगंगा व धोनीगंगा खोऱ्यात महाप्रकोप झाला. या नद्यांना पूर आले आणि हा महाकाय हिमनग कोसळल्याने सुमारे २०० पेक्षा अधिक लोक यामध्ये ठार झाले. ऋषी गंगा व धोनीगंगा या नद्यांना पूर आल्याने दोन प्रमुख जलविद्युत केंद्राची मोठी हानी झाली.

पर्यावरण तज्ञ यांच्या मते जो महाकाय हिमनग कोसळला त्याचे वस्तुमान २७ दशलक्ष घनमीटर इतके होते आणि हा महाकाय ज्या खोऱ्यात कोसळला त्यामुळे जी ऊर्जा निर्माण झाली ती हिरोशिमा येथे पडलेल्या अणुबॉम्बच्या पंधरा पट इतकी ऊर्जा निर्माण झाली होती. (या दुर्घटनेचे छायाचित्र युरोपियन स्पेस एजन्सीने टिपले आहे).

या दुर्घटनेवरून असं आपल्या लक्षात येते की पर्यावरण व निसर्गाची छेडछाड करून जे संकट उभे राहिले आहे ते अनुभवाच्या विस्फोटापेक्षाही कितीतरी पटीनं अधिक आहे या दुर्घटनेतून दिसून येते. याच उत्तराखंडातील जोशी मठाच्या प्रश्नाने देशाचेच नव्हे तर जगाचे लक्ष वेधलेले आहे. अर्ध जोशीमठ खाली करावा लागला आणि जोशीमठ सोडून विस्थापित होणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

**३)** दिनांक ३ ऑक्टोंबर २०२३ सिक्कीम राज्यातील ही घटना आहे. शिस्ता नदीला पूर आला. या पुरामुळे चुंग थांग शहर हे ८०% ढिगाराखाली गाडल्या गेले. प्राणहानी बरोबरच मोठ्या प्रमाणामध्ये वित्तहानी झाली. लष्कराचा ११००० कोटीचा दारूगोळा व वाहने या पुरामुळे वाहून गेली. बांगलादेशाच्या सीमेवर असणारा हा भाग लष्करीदृष्ट्या महत्त्वाचा आहे. लष्करासाठी बांधण्यात आलेल्या रस्त्यावरील सहा पूलंही वाहून गेली. आणि शिस्ता नदीवरील सहा जलविद्युत प्रकल्पाला या पुरामुळे मोठा फटका बसला.

**४)** जुलै ते ऑगस्ट २०२३ यादरम्यान हिमाचल प्रदेशातील उत्तरेकडील प्रदेशामध्ये पुरामुळे अभूतपूर्व विनाशकारी भूस्खलंन झाले. या भूस्खलनाने पाचशे नऊ लोक मृत्यूमुखी पडले. दोन हजार घरे उद्ध्वस्त झाली. अनेक रस्ते वाहून गेले या भागातील बहुतांश रस्त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. कुल्लू जिल्ह्यातील काही शाळा तीस ते चाळीस दिवस बंद होत्या. हिमाचल प्रदेश आपत्ती प्राधिकरणाच्या नोंदीप्रमाणे या आपत्तीमुळे दहा हजार कोटी पेक्षा अधिक नुकसान झाले.

हिमालयीन प्रदेशामध्ये अलिकडल्या काळामध्ये या भीषण प्रकोपाचे ही काही मोजकेच उदाहरणे आहेत. या विनाशकारी प्रलयामुळे या राज्यांचे अब्जावधी रुपयाचे नुकसान झाले. याशिवाय शेकडो लोकांना प्राण गमवावे लागले आणि पर्यावरणाचे नुकसान ही तर कधीच न भरून येणारी बाब आहे. यावरून हिमालयाच्या पर्यावरणाचा व तेथील जमिनीचा तेथील जंगलाचा व झाडांचा विचार न करता जो विकास अत्यंत क्रूर पद्धतीने येथील जनतेच्या व पर्यावरणाच्या माथी मारण्यात येत आहे त्याचे हे मोजकेच उदाहरणे आहेत.

केंद्र सरकारने हे वीज प्रकल्प, महामार्ग व पर्यटनाच्या अनुषंगाने शहरी विकासाचे जे प्रकल्प राबवले त्याकडे पर्यावरण तज्ञाच्या मताला व इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले त्याचे हे दुष्परिणाम आपणास दिसत आहे. भूगर्भीय, पर्यावरणाच्या अनुषंगाने हिमालयीन क्षेत्र हे हवामान बदलाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील प्रदेश आहेत. भविष्यात या प्रदेशामध्ये भूकंप व महापुराचे संकट येतील असा इशारा देशातील व जागतिक पर्यावरण व भूगर्भशास्त्र तज्ज्ञांनी व संस्थेने वेळोवेळी दिला आहे. नुकताच आंतरराष्ट्रीय स्तरावरील अभ्यास करणाऱ्या संस्थेने २०२४ मध्ये एक आहवाल प्रसिद्ध केला (द वर्ड रिक्स रिपोर्ट २०२४) त्यानुसार जगातील पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक जे भाग दाखवले आहे त्यामध्ये जगातील दहा ठिकाणांचा समावेश आहे. त्यामध्ये तिसऱ्या क्रमांकावर आशिया खंडातील पर्यावरणाच्या दृष्टीने हॉटस्पॉट म्हणून हिमालयाचा उल्लेख आहे.

**५)** गतवर्षी डिसेंबर २०२३ मध्ये दुबईस्थित हवामान शिखर परिषद झाली. या परिषदेमध्ये भूपृष्ठीय पर्वतरांगा असलेल्या देशांच्या प्रतिनिधींची बैठक होती. या बैठकीत संबोधताना संयुक्त राष्ट्रसंघाचे सरचिटणीस ऑटोनियो गुटेरेस म्हणाले की हिमालय इतिहासात कधी नव्हे इतका संकटात आहे तो रडत आहे आणि आपणाकडे मदतीची विनवणी करत आहे आपण जर हिमालयाला वेळीच मदत केली नाही तर भविष्यात विनाशकारी आपत्ती ओढवेल. असा इशारा त्यांनी दिला आणि हिमालय हे भारतातील सिंधू ब्रह्मपुत्रा आणि गंगा या नदीचे उगमस्थान असल्याने या नद्यांच्या पाण्यावर २४ कोटी लोकांचे जीवन अवलंबून आहे. हिमालय वाचवण्यासाठीच्या उपाय योजना अपुऱ्या पडत असून विकसित व विकसनशील देशांनी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था आणि बहुराष्ट्रीय विकासाची पुनर्रचना करण्याची वेळ आली असल्याचे त्यांनी सांगितले. **

## कोण आहेत सोनम वांगचुक

पर्यावरणवादी व विज्ञानवादी,अभियंते सोनम वांगचुक यांची लडाखच्या विकासासंदर्भात जी भूमिका आहे ती पर्यावरण पूरक अशी आहे हे आपल्या कृतीतूनही दाखवून दिले आहे. त्यांनी -२० ते -४० अंश सेल्सिअस तापमान




असलेल्या लडाखमध्ये भारतीय सैनिकांना उबदार असे सोलार टेन्ट उभारून दिले. तसेच या भागामध्ये कार्बन न्यूट्रल सोलर बिल्डिंग डिझाईन पण त्यांनी केली. याशिवाय येथील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आईस स्तूपस कन्सेप्ट माध्यमातून कृत्रिम बर्फ तयार करण्याचे तंत्र ही त्यांनी विकसित केले. लडाख प्रदेशातील लोकांच्या न्याय हक्कासाठी व पर्यावरणासाठी सोनम वांगचुक हे खऱ्या अर्थाने हिमालयाचा आर्तटाहो तील दुःख सांगण्यासाठी एक देवदूत म्हणून आले आहेत. हिमालयाच्या वेदना समजून घेण्याची ही कदाचित शेवटची संधी असणार आहे दिल्लीश्वर,केंद्र सरकारने या मागण्यांकडे संवेदनशील मनाने पाहिले नाही तर पर्यावरणाचा होत असलेला विध्वंस हा देशाचाही विध्वंस करू शकेल उत्तराखंड, हिमाचल, सिक्कीम आदी राज्यातील पर्यावरणाचा प्रकोप ही एक झाकी है लडाखच्या नंतर हिंदुस्तान की तबाई अब तो बाकी है अशी म्हणण्याची वेळ येऊ नये!

आणि जाता जाता उत्तराखंडातील प्रसिद्ध लोककवी यांची एक कविता आठवते.

गंगा यमुना की छाती पर
कंकड पत्थर कूट रहे हो!
उफ! तुम्हारी ये खुदगर्जी कब तक चलेगी मन मर्जी!
जिस दिन डोलेगी ये धरती सर से सब निकलेगी मस्ती!
अब महल चौबारे बह जायेंगे, जब बोल
व्यापारी क्या होगा?
दिल्ली देहरादून में बैठे योजनाकारी तब क्या होगा?

# बिनकामाचा विकास अंगलट येणार?



आविष्कार देसाई

गेल्या पाच वर्षांत अलिबाग-मुरुड विधानसभा मतदारसंघाचा विकास केल्याच्या गमजा मारणाऱ्या आमदार महेंद्र दळवी यांना साधे रस्ते, पाणी आणि आरोग्याचा प्रश्न सोडवता आलेला नाही. प्रकल्पग्रस्तांना केवळ आश्वासने देऊन त्यांच्या मतांवर डोळा ठेवण्यात येत आहे, तसेच बेरोजगारांच्या प्रश्न सोडवता न आल्याने महायुतीच्या उमेदवाराविरोधात मतदारांच्या मनामध्ये प्रचंड असंतोष खदखदत आहे. होऊ घातलेल्या निवडणुकीत हेच मुद्दे सत्ताधाऱ्यांच्या अंगलट येण्याची शक्यता असल्याचे मतदारांमधून बोलले जात आहे.

अलिबागमध्ये प्रामुख्याने विविध महत्त्वाची सरकारी कार्यालये आणि त्यांची मुख्यालये आहेत. त्यामुळे या ठिकाणी दररोज कामानिमित्त येणाऱ्यांची संख्या अधिक आहे. त्याचप्रमाणे अलिबाग हा पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा भाग आहे. असे असतानाही या ठिकाणी पायाभूत सुविधांचा अभाव आहे. अलिबागमध्ये प्रामुख्याने दर्जेदार रस्त्यांची कमतरता आहे. दरवर्षी रस्त्यांवर कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करण्यात येतो. मात्र, रस्त्यांची स्थिती काही सुधारताना दिसून येत नाही. यामध्ये लोकप्रतिनिधी हेच ठेकेदार असल्याने कोणत्याही सरकारी यंत्रणेचे याविरोधात कारावाई करण्याचे धाडस होत नाही.

खराब रस्त्यांमुळे नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. प्रस्तावित अलिबाग-विरार कॉरिडोरचा प्रश्न प्रलंबित आहे. अलिबाग तालुक्यातील सर्वात मोठी गंभीर समस्या म्हणजे अशुद्ध पाण्याचा पुरवठा. काही ठिकाणी डिसेंबरअखेरच पाण्यासाठीही वणवण सुरू होत असल्याने नागरिकांमध्ये संताप आहे.

गेल्या काही वर्षांपासून उमटे धरणातून परिसरातील ६२ गावांना पाणीपुरवठा केला जातो. या धरणातून नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी आतापर्यंत कोट्यवधी रुपये खर्च करून जिल्हा परिषदेने जलशुद्धीकरण प्रकल्प राबवला होता. मात्र, त्याचेही काम अर्धवट राहिल्याने सुमारे सव्वालाख नागरिकांना गढूळ पाणी प्यावे लागत आहे. सातत्याने अशुद्ध पाणी प्यावे लागत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या ठिकाणचा गाळ काढण्यासाठी शेकापच्या चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी अथक परिश्रम घेतले होते. प्रशांत नाईक यांनी यासाठी चांगलाच हातभार लावला होता. याचा विसर जनतेला कधीच होणार नाही. गाळ काढल्यामुळे सध्या कोट्यवधी लीटर पाणी साठवले गेले आहे. हातात सत्ता नसताना चिऊताई यांनी पाण्याचा प्रश्न सोडवला होता. त्यांना आमदार केल्यावर त्या शुद्ध पाण्याचा प्रश्नदेखील सोडवतील, असा विश्वास येथील ६२ गावांतील नागरिकांना वाटत आहे.

अलिबाग ... जिल्ह्याचे ठिकाण असल्याने या ठिकाणी उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा असणे आवश्यक आहे. मात्र, येथील जिल्हा सरकारी रुग्णालयांमध्ये डॉक्टरांची कमतरता आहे. सीटीस्कॅन मशीन, एक्स-रे मशीन (अधूनमधून बंद) यासाठी लागणारे आवश्यक मनुष्यबळच नाही. जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची आवश्यकता असताना येथे आरोग्य व्यवस्थेची दैना उडालेली आहे. आरोग्याचा प्रश्न सोडवण्यात आमदार महेंद्र दळवी यांना सपशेल अपयश आले आहे. हे जनता आता ओळखून आहे.


जिल्हा नियोजन समितीचा आराखडा तब्बल ३६० कोटी रुपयांचा, जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प सुमारे ६० कोटी, दहा नगरपरिषदांचा सुमारे ३०० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प, तळा, माणगाव, म्हसळा, पाली आणि पोलादपूर या नगरपंचायतींचा मिळून सुमारे अडीच-तीन कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आहे. यासह केंद्र आणि राज्यांच्याही कोट्यवधी रुपयांच्या विकास योजना आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी असतानाही तालुक्यातील विकासकामांचे प्रश्न कसे निर्माण होतात, हाच खरा प्रश्न आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी नेमका कोणाच्या घशात जातो. याचे उत्तर आता मतदार आमदार महेंद्र दळवी यांना विचारत आहेत.

विकासाच्या नावावर येथील स्थानिकांनी आपल्या जमिनी प्रकल्प उभारण्यासाठी दिलेल्या आहेत. मात्र, आजही प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न तसेच आहेत. त्यामध्ये आरसीएफ, गेल, एचपीसीएल अशा प्रकल्पांचा समावेश आहे. शुद्ध

## आ. दळवींविरोधात मतदारांमध्ये प्रचंड असंतोष

> काम करणाऱ्या चांगल्या व्यक्ती या राजकारणात आल्या पाहिजेत. आज रस्त्यांची प्रचंड दुरवस्था झाली आहे. पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. रोजगार नाही, पर्यटन व्यवसायाला गती नाही. जनतेचा विकास साधणारा चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्यासारखा उच्च शिक्षित उमेदवारच अलिबागचे नशीब बदलवू शकले.
>
> – अमित सोनावणे, मतदार

पाणी, आरोग्य सुविधा, चांगले रस्ते अशा माफक गरजा आहेत. त्याही वेळेत पूर्ण होत नसतील, तर आमदार महेंद्र दळवी यांच्यासारख्या लोकप्रतिनिधींना निवडून का द्यायचे, असा प्रश्न मतदारांच्या मनात पडला नसेल तर नवलच म्हणावे लागेल. **



> मतदारसंघाचा विकास करताना युवकांच्या प्रश्नांकडे आमदारांनी गांभीर्याने लक्ष दिले नाही. शिक्षण घेतल्यावर नोकरीसाठी मुंबई-पुण्यात जावे लागते. आपल्याकडे गेल्या पाच वर्षांत उद्योग आणण्याच्या फक्त घोषणाच करण्यात आल्या आहेत. प्रत्यक्षात एकाही उद्योगाची वीट लावली नाही. मग आम्हा युवकांना रोजगार कसा मिळणार?
>
> – अक्षय देशमुख, युवक

### मतदार संघावर दृष्टीक्षेप

- **१९९०**
  १) ॲड. दत्ता पाटील-शेकाप -५८,८७८ विजयी
  २) विजय कवळे-काँग्रेस-४३,५९६
  ३) अर्जुन पाटील-शिवसेना-१२,३१६
- **१९९५**
  १) मीनाक्षी पाटील-शेकाप-६१,५०४ (विजयी)
  २) प्रशांत पाटील-शिवसेना-२६,३६२
  ३) विजय कवळे-काँग्रेस-३८,३६९
- **१९९९**
  १) मीनाक्षी पाटील-शेकाप-५३,४५९ (विजयी)
  २) मधुकर ठाकूर-काँग्रेस-३५,४९२
  ३) सुरेंद्र म्हात्रे-शिवसेना- २१,६५९
- **२००४**
  १) मधुकर ठाकूर-काँग्रेस - ६५,८२८ (विजय)
  २) मीनाक्षी पाटील-शेकाप-५९,९६१
  ३) नरेश रहाळकर-शिवसेना-१२,९७२
- **२००९**
  १) मीनाक्षी पाटील-शेकाप-९३,१७३ (विजयी)
  २) मधुकर ठाकूर-काँग्रेस-६९,०२५
  ३) राजाराम पाटील-अपक्ष-२,१७५
- **२०१४**
  १) सुभाष उर्फ पंडित पाटील-शेकाप-७६,५३९ (विजयी)
  २) महेंद्र दळवी-शिवसेना-६०,६५२
  ३) मधुकर ठाकूर-काँग्रेस-४२,७३७
- **२०१९**
  १) महेंद्र दळवी-शिवसेना-१,११,९४६ (विजयी)
  २) सुभाष उर्फ पंडित पाटील-शेकाप-७९,०२२
  ३) राजेंद्र ठाकूर-अपक्ष-११,८९१

# करंजा मच्छिमार बंदर



## एक अहंकाराची वांझोटी हाक

सीताराम नाखवा

करंजा बंदर गेल्या कित्येक दशकांपासून कोळी समाजाचे एक स्वप्न की आपल्या गावात एक विकसित मत्स्य बंदर झाले पाहिजे. परंतु, आमदारांच्या म्हणण्यानुसार, आपण सांगू तेच योग्य आणि करू तेच बरोब्बर ह्या हेकेखोर पद्धतीने लोकांना दहशतीत ठेवण्यात येत आहेत. बंदर हे आता पूर्ण झाले नसताना सुद्धा शासन निर्णयानुसार कुठल्याच सुविधांची परिपूर्णता झालेली नसताना १४९ कोटी अखेर खर्च झाले कुठे? याबाबत स्थानिक मच्छिमार कोळी समाजाच्या लोकांमध्ये नेहमीच दबक्या आवाजात चर्चा होत असते. आणि त्याचाच हा परिणाम आहे की, बंदर पूर्ण अवस्थेत नसताना सुद्धा भ्रष्टाचाराच्या गाळाने भरले आहे.

शरद पवार हे केंद्रात कृषी मंत्री असताना त्यांनी या बंदराचा आराखडा तयार केला होता. त्यास मुख्य कारण म्हणजे माजी राज्यमंत्री मीनाक्षीताई पाटील यांचा सततचा पाठपुरावा. सन २००९ ला या बंदराचा परिपूर्ण अभ्यास सीआईसीएफ बँगलोर या संस्थेने करून त्याचा तांत्रिक नकाशासहित प्रस्ताव केंद्रीय कृषी मंत्रालयाला पाठविला. परंतु, अचानक असे काय घडले की, या बंदराच्या जागी कडक कातळ (खडक) लागला जेणेकरून ड्रेजिंग करण्याची आवश्यकता लागली. तेव्हा हेच काम ६८ कोटी वरून १४९ कोटी इतके झाले. तेव्हाच एका लबाड व धूर्त माणसाला ह्याचा वास आला आणि गावातील साध्या भोळ्या भाबड्या लोकांना त्यांच्या भावनांशी खेळ केला. आपला राजकीय व व्यावसायिक स्वार्थ साधण्यासाठी कोळी समाज हाताशी धरले. केंद्रात आपल्या मर्जीची माणसे आहेत, ह्याचा फायदा घेऊन सदरचे बंदर मीच आणले आहे, ह्या लोभाने कंत्राटदाराला हाताशी धरले. गावातील प्रतिष्ठित व सोसायटीच्या लोकांना सोबत घेऊन स्वतःच्या फायद्यासाठी देवेंद्र फडणवीस सरकारच्या कार्यकाळात आपले तत्कालीन वित्त व नियोजन मंत्री तथा वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासमवेत सह्याद्री अतिथीगृहात बैठक घेतली. परंतु, तत्कालीन मत्स्यव्यवसाय मंत्री महादेव जानकर यांना बैठकीस घेतले नाही.

बेकायदेशीररित्या महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन सदर बंदराची दिशा व आकृती एका दिवसात केंद्र सरकारला विश्वासात न घेता बदली.

ड्रेझिंग करताना कडक कातळ लागला याचे कारण दाखवून खर्च तीनपट केला. वास्तविक, कडक कातळ या जागी नव्हताच, मग ड्रेझिंगचे ७७ कोटी गेले कुठे? कारण, कातळ फोडण्यासाठी आवश्यक यंत्र सामुग्री कधी या ठिकाणी वापरलीच नाही, मग कातळ कसे काढले की ते होतेच नव्हते. याबाबत स्थानिक मच्छिमार कोळी समाजाचे लोकांमध्ये नेहमीच दबक्या आवाजात चर्चा होतं असते. आणि त्याचाच हा परिणाम आहे की बंदर पूर्ण अवस्थेत नसतानासुद्धा भ्रष्टाचाराच्या गाळाने भरले आहे.

आणि आज जे काही चेले चपाटे सांगत फिरत आहेत की, आमदार महेश बालदी यांनी हे बंदर केले आहे, मग करंजा मच्छिमार सहकारी सोसायटीच्या मच्छिमार बोट अपघात फंडाचा वापर ह्या बंदरावर इतर सुविधा निर्माण करण्यासाठी लाखो रुपयांचा का केला जातोय? हा प्रश्न आज गावातील लोकांना पडला आहे. परंतु, आमदारांच्या म्हणण्यानुसार, आपण सांगू तेच योग्य आणि करू तेच बरोब्बर ह्या हेकेखोर पद्धतीने लोकांना दहशतीत ठेवण्यात येत आहेत. बंदर हे आता पूर्ण झाले नसतानासुद्धा शासन निर्णयानुसार कुठल्याच सुविधांची परिपूर्णता झालेली नसताना १४९ कोटी अखेर खर्च झाले कुठे?

कारण, यामध्ये पार्किंग स्थळ काँक्रिटकरण, प्रशासकीय कार्यालय, गियर शेड, जाळी विणण्यासाठी शेड, कोळी बांधवासाठी आराम गृह, ब्रेक वॉटर वॉल, कंपाऊंड वॉल, विद्युतपुरवठा केंद्र इ. सुविधा निर्माण होणे आवश्यक असताना १४९ कोटी अखेर कोणाच्या खिशात आणि कसे गेले, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. म्हणून जे झालेच नाही, ते झाले सांगून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे, हे सिद्ध होत आहे. गुणवत्ता व मानक याचा कुठलाच दर्जा नसल्याने हे बंदर मासेमारी नौकासाठी आज धोकादायक झाले असून, २४ तास तरंगते बंदर म्हणून खोटे दावे सादर करीत दिशाबदल केल्यामुळे ओहोटीच्या वेळी नौका बंदरात दाखल होऊच शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. - ९५९४६६५८७६

# स्कॉलरशिप परीक्षा : गणिती सूत्रे, क्लृप्त्या व युक्त्या





भूमितीमध्ये येणाऱ्या विविध भौमितिक आकारांपैकी एक वर्तुळ आहे. वर्तुळाशी संबंधित प्रथम प्रमेय इ.स ६५० च्या आसपास थेलेस यांनी मांडले. अस म्हणतात की, इजिप्शियन लोकांनी एका सूत्राद्वारे वर्तुळाचे क्षेत्रफळ मोजले. त्यांनी साठी ३.१६०५ चे अंदाजे मूल्य दिले.

आज आपण वर्तुळ, त्याची व्याख्या, त्याचे सूत्र, त्याचे गुणधर्म इत्यादीविषयी माहिती पाहणार आहेत.

१) वर्तुळ म्हणजे दिलेल्या बिंदूपासून/केंद्रापासून दिलेल्या अंतरावर असलेल्या एकाच प्रतलातील सर्व बिंदूंचा समावेश असलेला आकार होय.

२) वर्तुळ म्हणजे प्रतलातील एक वक्र असून, त्यांच्यावरील प्रत्येक बिंदू एका विशिष्ट बिंदूपासून ठराविक अंतरावर असतो. या विशिष्ट बिंदूस वर्तुळ मध्य, वर्तुळ केंद्र म्हणतात.

भूमितीय रचनांमध्ये वर्तुळाला फार महत्त्व आहे. कारण परंपरेने भूमितीमधील प्रश्नांची उकल करताना रचना फक्त सरळपट्टी व कंपास यांनीच करावयाच्या असतात. त्यामुळे दिलेल्या अटी पूर्ण करण्यासाठी वर्तुळे काढण्याचा अभ्यास आवश्यक असतो.




वर्तुळाचे तीन प्रकार आहेत.

१) स्पर्शीका वर्तुळे - दोन किंवा अधिक वर्तुळे जी एकमेकांना एका बिंदूत छेदतात.

२) केंद्रीभूत वर्तुळे - दोन किंवा अधिक वर्तुळे ज्यांचे केंद्र समान असते. पण, त्रिज्या भिन्न असतात.

३) एकरूप वर्तुळे:- दोन किंवा अधिक वर्तुळे ज्यांची त्रिज्या समान आहे, परंतु केंद्रे भिन्न आहेत.

प्रथम वर्तुळाचे गुणधर्म पाहू

१) वर्तुळाच्या केंद्र बिंदुतून परिघाला जाऊन मिळणाऱ्या रेषाखंडाला वर्तुळाची त्रिज्या म्हणतात.

२) केंद्रबिंदूतून निघून जाणाऱ्या व वर्तुळाच्या परिघावरील दोन बिंदूंना जोडणाऱ्या रेषा खंडास वर्तुळाचा व्यास म्हणतात.

३) वर्तुळाचा व्यास हा त्या वर्तुळाच्या त्रिज्येच्या दुप्पट असतो.

४) वर्तुळाच्या परिघावरील कोणत्याही दोन बिंदूंना जोडणाऱ्या रेषाखंडाला वर्तुळाची जीवा असे म्हणतात.

५) व्यास म्हणजे वर्तुळाची सर्वात मोठी जीवा होय.

आकडेमोड

राजेंद्र पाटील
९८२२३०२०८५

६) वर्तुळाचा व्यास हा त्रिज्येच्या दुप्पट व परिघाच्या $\frac{७}{२२}$ पट असतो.

७) वर्तुळाचा परीघ हा त्रिज्येच्या $\frac{४४}{७}$ पट व व्यासाच्या $\frac{२२}{७}$ पटअसतो.

**वर्तुळाविषयी काही सूत्रे**

१) वर्तुळाचा परीघ व व्यासातील फरक = $\frac{२२D}{७} - D = \frac{१५D}{७}$ (D= व्यास)

२) अर्धवर्तुळाची परिमिती = $\frac{११D}{७}+D$ (D=व्यास)

किंवा वर्तुळाचा व्यास, त्रिज्या (r) $\times\frac{३६}{७}$

३)अर्धवर्तुळाची त्रिज्या= परिमिती$\times\frac{७}{३६}$

४) वर्तुळाचे क्षेत्रफळ = $\pi\times(\text{त्रिज्या})^{२}\pi2(=\frac{22}{७}$ अथवा ३.१४)

५) वर्तुळाची त्रिज्या = क्षेत्रफळ $\times\frac{७}{२२}$

६) वर्तुळाची त्रिज्या=(परीघ - व्यास)$\times\frac{७}{३०}$

७) अर्धवर्तुळाचे क्षेत्रफळ = $\frac{\pi\times r^2}{२}$ किंवा $\frac{११\times r^{२}}{७}$

८) अर्धवर्तुळाची त्रिज्या = अर्धवर्तुळाचे क्षेत्रफळ $\times\frac{२२}{७}$

किंवा परिमिती $\times\frac{७}{३६}$

९) दोन वर्तुळांच्या त्रिज्यांचे गुणोत्तर = त्या वर्तुळांच्या परिघांचे गुणोत्तर

१०) दोन वर्तुळांच्या क्षेत्रफळाचे गुणोत्तर हे त्या वर्तुळाच्या त्रिज्यांच्या गुणोत्तराच्या किंवा त्या वर्तुळाच्या परिघाच्या गुणोत्तराच्या वर्गाच्या पटीत असते.

११) वर्तुळाची त्रिज्या दुप्पट केल्यास क्षेत्रफळ चौपट येते.

हे ही लक्षात ठेवा.

१) वर्तुळक्षेत्र - प्रतलात काढलेल्या वर्तुळामुळे प्रतलाचे ३ भाग पडतात १) वर्तुळ कंसाचा अंतर्भाग २) वर्तुळ कंसाचा बाह्य भाग ३) प्रत्यक्ष वर्तुळ

२) वर्तुळ कंस- वर्तुळावर कोणतेही दोन बिंदू घेतले की वर्तुळाचे दोन भाग होतात. यापैकी एका भागाला कंस म्हणतात.

३) केंद्रीय कोन - वर्तुळकेंद्र हाच शिरोबिंदू असणाऱ्या कोनाला केंद्रीय कोन म्हणतात.

४) लघु कंसाचे माप - लघुकंसाच्या संगत केंद्रीय कोनाचे माप हेच लघुकंसाचे माप असते.

५) वर्तुळाचे क्षेत्रफळ - वर्तुळाच्या परिघाने मर्यादित केलेले क्षेत्र म्हणजे वर्तुळाचे क्षेत्रफळ होय.

६) वर्तुळाचा परिघ :- वर्तुळाच्या कडेची लांबी म्हणजे वर्तुळाचा परिघ होय.

७) विशाल कंसाचे माप = ३६०० असते.

८)अर्धवर्तुळ कंसाचे माप = १८०० असते.

९)एकरूप वर्तुळे - दोन वर्तुळांची त्रिज्या समान असेल तर त्यांना एकरूप वर्तुळे म्हणतात.

१०) चक्रीय चौकोन - ज्या चौकोनाचे चारही शिरोबिंदू एकाच वर्तुळावर असतात त्याला चक्रीय चौकोन म्हणतात.

उदाहरणे:-

१) एका वर्तुळ केंद्रातून जाणाऱ्या जीवेची लांबी ५० से.मी. आहे तर त्या वर्तुळाची त्रिज्या किती सेमी?

स्पष्टीकरण=त्रिज्या=$\frac{\text{केंद्रातूनजाणाऱ्या जीवेची लांबी}}{२}$

$=\frac{५०}{२}$

= २५ से.मी.

२) दोन वर्तुळांच्या क्षेत्रफळाचे गुणोत्तर १६.२५ आहे तर त्यांच्या परिघांचे गुणात्तर किती?

स्पष्टीकरण:- परीघांचे गुणोत्तर = क्षेत्रफळाच्या गुणोत्तराचे वर्गमूळ


= १६ :२५

= ४ : ५ **

## समाज प्रबोधन करणारी...

# डोळस दान आणि प्रकाशाची पहाट

डोळस दान (एकांकिका) आणि प्रकाशाची पहाट (कवितासंग्रह) हे श्रीपाद आगाशे यांचे एकत्रित पुस्तक ठाण्याच्या पुष्पश्री प्रकाशनने देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. या पुस्तकाला डॉ. विकास आमटे यांचा संदेश लाभला आहे. श्रीपाद आगाशे गेली, सुमारे चार दशके नेत्रादानाचा प्रचार आणि प्रसार करीत आहेत. या साहित्य शिल्परूपी पुस्तकाला उदंड प्रतिसाद मिळून त्याद्वारे या मोहिमेला गती मिळेल, असे डॉ. विकास आमटे यांना वाटते आहे. सुप्रसिद्ध नाटककार शशिकांत कोनकर आणि सुप्रसिद्ध कवी सतीश सोळांकुरकर यांची अनुक्रमे एकांकिका आणि कवितासंग्रहाला प्रस्तावना लाभली आहे. 'मरणोत्तर नेत्रदान' हा विचार आगाशे यांनी एकांकिकेत मांडला आहे. त्यामध्ये केवळ प्रचार नसून, एकांकिका या लालित्यपूर्ण माध्यमातून, रंजकतेने मांडली आहे. या एकांकिकेचा प्रयोग गडकरी रंगायतन मध्ये नामवंत कलाकारांनी सादर केल्याची नोंदही कोनकर यांनी केली आहे. विविध ठिकाणी ही एकांकिका झाल्यास त्यामुळे नेत्रदानास प्रोत्साहन मिळेल. मरणानंतरही नेत्रदान करता येते हा एकांकिकेतील विचार उत्तुंग आहे, प्रवृत्तीपर आहे, असेही शशिकांत कोनकर यांनी नोंदविले आहे. या पुस्तकाची मुखपृष्ठ संकल्पना अतुल भिडे यांची आहे.




पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

''डोळस दान'' या नेत्रविषयक एकांकिकेत श्री. आणि सौ. श्रीकांत हे नेत्रदान करणार आहेत. त्यांच्याकडे आलेला शरद दारावरच्या, अशा आशयाचा स्टिकर पाहत घरात आल्याने उंबरठ्याला अडखळून पडतो. त्यामुळे नेत्रदान विषयाची चर्चा सुरू होते. त्यामध्ये त्याची पत्नीही मग सामील होते. डोळे असूनही न पाहिल्याने उंबरठ्याला अडखळल्याने पडलेल्या शरदला अंधांचे विश्व कसे असेल याविषयी श्रीकांत सांगतो. मृत्यूनंतर नेत्रदान करण्याविषयी आपला संकल्प कुटुंबात आणि मित्रमंडळीत जाहीर करणे का गरजेचे हे श्रीकांत आणि त्याची पत्नी स्पष्ट करते. कोणीही व्यक्ती नेत्रदान कसे करू शकते, हे संवादातून स्पष्ट होते. नेत्रदान करताना काय करावे, हेही स्पष्ट होते. सार्वत्रिक अनास्था, अज्ञान, अंधश्रद्धा हे नेत्रदानाच्या मार्गातील प्रमुख अडथळे आहेत. डोळ्यांचा कॉर्निया सदोष असणाऱ्या अंधांनाच नेत्रदानामुळे दिसू शकते. सर्व अंधांना, नेत्रदान पुरेसे झाले तरी दिसू शकणार नाही. अशा अंधांची संख्या तीस लाख आहे भारतातील एकूण अंधांची संख्या सुमारे सव्वा कोटी आहे. भारतात दरवर्षी ८० ते ८५ लाख व्यक्ती मरतात. त्यापैकी फक्त दरवर्षी पंचवीस हजारच नेत्रदान करतात. लोकसंख्येने अत्यंत कमी असणाऱ्या श्रीलंकेतून आपल्या देशाला असे ''नेत्र'' घ्यावे लागतात. कोणत्या परिस्थितीत नेत्रदान करता येत नाही, त्याचीही चर्चा संवादातून उत्तम प्रकारे होते. ज्यांचा कॉर्निया चांगला आहे, परंतु अन्य कारणांमुळे जे अंध आहेत, अशा अंधांनाही मृत्यूनंतर नेत्रदान करता येते, ही विशेष माहिती श्रीकांत देतो. देहदानाबरोबरच नेत्रदान होतेच असा काहींचा कसा गैरसमज आहे, हेही श्रीकांत संवादातून स्पष्ट करतो. नेत्रदान, त्वचादान करून नंतर देहदान करावे. अंधांची संख्या वाढतेच आहे. भारतात दरवर्षी चाळीस हजार बालके निव्वळ कुपोषणामुळे म्हणजेच ('अ' जीवनसत्वाच्या अभावामुळे) अंध होतात. त्यासाठी काय खावे याचीही चर्चा होते. नेत्रदानाला कोणत्याही धर्माचा विरोध नाही, हेही स्पष्ट होते. नेत्रदान चळवळ यशस्वी करण्यासाठी प्रत्येक जण काय करू शकेल, त्याची सकारात्मक चर्चा होऊन तेथेच एकांकिका संपते.

''प्रकाशाची पहाट'' नेत्रदान विषयक कवितासंग्रहात एकूण अठरा कविता समाविष्ट असून या कवितासंग्रहाला सुप्रसिद्ध कवी सतीश सोळांकुरकर यांची प्रस्तावना लाभली आहे. व्याख्याने, माहितीपुस्तिका, खेडोपाडी प्रवास, वृत्तपत्रांतून लेखन अशा विविध मार्गांनी श्रीपाद आगाशे गेली कित्येक वर्षे लोकांना दृष्टिदानाचे महत्त्व पटवून देऊन, त्यांना दृष्टिदानासाठी प्रवृत्त करीत आहेत. काही कवितांतून आपल्या निष्क्रिय समाजाबद्दलची चीड व्यक्त होताना दिसते. तर काही ठिकाणी मानवतेचा दाखला देऊन, आगाशे नेत्रदानासाठी आर्जव करीत आहेत. काव्यशास्त्राचे या कवितांना नियम लावता येणार नाहीत. कारण त्यामागील भावना महत्त्वाच्या आहेत. या कवितांमुळे नेत्रदानाचे पुण्यकार्य करण्यास तसेच अवतीभवतीच्या लोकांना नेत्रदानाचे महत्त्व पटवून देण्याचे काम करण्यास लोक प्रवृत्त होतील, अशी आशा सतीश यांनी शेवटी व्यक्त केली आहे. अंधकार, या पहिल्या कवितेत बहुसंख्य अंधांच्या जीवनातील भयाण आणि जीवघेण्या अंधकाराची वाचकाला कल्पना येते. भारतातील सव्वा कोटी अंधांपैकी तीस लाख अंधांच्या नेत्रांवर पारपटलाचे रोपण झाल्यास त्यांचे जीवन उजळेल, हे दुसऱ्या कवितेत प्रभावीपणे मांडले आहे. मानवतावादी दृष्टीने अंधांविषयी कणव वाटल्यासच लोक नेत्रदान करतील. परंतु हे होत नाही. अंधश्रद्धा, डोळ्यांवरील अज्ञानाची झापडे किंवा केवळ अनास्थ्येमुळे लोक नेत्रदान करीत नाहीत. नेत्रदानाचा 'पण' या कवितेत श्रीपाद शेवटी म्हणतात,

**प्रकाशाने जीवन उजळावे**
**द्यावे नवजीवनच आपण**
**दानाते आपण पावन व्हावे**
**नेत्रदानाचा करू या 'पण' ..(४४)**

नेत्रदानाबाबत आपण पुढाकार न घेतल्याने, त्यासाठी श्रीलंकेपुढे आपल्याला लाचारी करावी लागते, हे 'शेम-शेम' कवितेत कवीने मांडले आहे. दरवर्षी भारतात तब्बल ८० लाख मरण पावतात, पण नेत्रदान दरवर्षी होते फक्त तीस हजार. मृत व्यक्तींचे नेत्र शरीरांबरोबरच जाळून किंवा पुरून टाकण्याऐवजी, नेत्रदानामुळे त्यांचा पुनर्वापर कसा होतो हे ''नेत्रदानाला देऊ गती'' या कवितेत प्रभावीपणे मांडले आहे. तरच सर्वांना प्रकाशाची पहाट दिसेल असा आशावाद श्रीपाद यांनी व्यक्त केला आहे. या पुस्तिकेत नेत्रदान, त्वचादान, देहदान याबद्दलची माहिती सविस्तरपणे सोप्या शब्दांत स्पष्टपणे मांडली आहे. हे छोटेसे पुस्तक प्रत्येक समाजसेवा करून इच्छिणाऱ्यास प्रोत्साहन देऊ शकते. श्रीपाद आगाशे यांचा सविस्तर, सचित्र परिचय करून दिला आहे. **

पुस्तकाचे नाव : डोळस दान , प्रकाशाची पहाट
लेखक,कवी : श्रीपाद आगाशे ९९६९१६६६०७
प्रथम प्रकाशन : १५ ऑगस्ट २०१८
पृष्ठे : ६४ मूल्य : रुपये ५०/-

# 'गवळदेव' एक सांस्कृतिक वनभोजन..

'गवळदेव' हा तळकोकण पट्ट्यातील एक गुराख्याचा सामाजिक विधीचा वनभोजनात्मक सोहळा असतो. भगवान श्रीकृष्णाने संवगड्यासोबत घनदाट अरण्यामध्ये सुरु केलेला एक सामुदायिक भोजनाचा विधीपूर्वक कार्यक्रम असतो. गुळगुळीत दगडांची रचना करून देवत्वाचे प्रतिक मानून पूजन केले जाते. गुळगुळीत दगड म्हणजे पूर्वी 'गोवळ' हा शब्द अभिप्रेत होता. पुढे उच्चाराच्या भाषिक परिवर्तनामुळे किंवा प्राकृत भाषेच्या प्रभावामुळे 'गवळदेव' असा शब्दप्रयोग रुढ झाला. गुळगुळीत दगडांच्या पूजनावरून 'गवळदेव' हे नाव प्रचलित झाले असावे, असा जाणकार अनुभवी माणसं अंदाज दर्शवितात. पाणथळी जवळच्या जंगलात वडाच्या किंवा पिंपळाच्या झाडाच्या जवळ गुराख्याच्या सामाजिकतेचं एक पारंपरिक पूजन आणि वनभोजन अर्थात तेही पूर्ण विधीवत केले जाते. फक्त पुरूष वर्गाने बनविलेले परंपरागत पद्धतीने बनविले जेवण. अर्थात, मिक्सरचा किंवा पत्रावळीचाही वापर त्याज्य समजला जातो. डाळ (वरण), भोपळ्याची भाजी किंवा बटाट्याची भाजी आणि भात... एवढेच पदार्थ.. अलीकडच्या काळात लोणचे पापड... अशा पदार्थांचा वापर होत असेल. फक्त खोबरं कातून वरण डाळ बनविलेली असते. शेवटी सोलकढी दिली जाते. या जेवणाची चव काय चाखाल... अहाहा.... अतिशय चटकदार... लज्जतदार असते. काहीअंशी वडे पण बनविलेले असतात, पण ते दातांना तुटणे अशक्य...न फुगलेले असतात. कारण पुरुषवर्गाने बनविलेले असतात. हिरव्या मिरच्या अख्ख्या कापून बनविलेला वरण डाळ तर अप्रतिम असते. सोजी 'स्वीट डिश' म्हणून असते.

दिवाळीआणिदेवदिवाळीच्यादरम्यान कुठल्यातरी रविवारी गवळदेव आयोजित केला जातो. प्रत्येक वाडीचा गवळदेव असतो. गोल गुळगुळीत आकाराच्या देवत्वाने अभिमंत्रित झालेल्या पावन दगड रुपीमूर्तीसोबत एक तुळशी वृंदावन बनविलेले असते. त्याच्या बाजूला एक मातीचा वाघ बनवला जातो. त्याचे पूजन केले जाते. वाडीतील मानकार सदस्यांच्या नावाने जेवणाच्या छोट्या-छोट्या वाड्या तयार करून गवळदेवाजवळ व तिथल्या तुळशीवृंदावनाच्या समोर ठेवल्या जातात. या वाडी म्हणजे गवळदेवाचा प्रसाद समजला जातो. या गोष्टीचा प्रचंड आदर आणि अभिमान बाळगला जातो. या अशा परंपरा आपल्याला निसर्गरम्य परिसराबद्दलची ओढ मनामध्ये कायम ठेवली जाते. वाघासाठीसुद्धा एक वाडी ठेवली जाते.




धनंजय शेटये

शेवटी ही वाडी घेऊन पाच फेऱ्या गवळदेवाच्या भोवती मारायच्या, बाकीच्या जमलेल्या लोकांनी या वाघ पळवणाऱ्या माणसाला म्हणजे वाघाला समजून त्याला हुसकावून लावायचे, जोरात ओरडायचे. मग त्या व्यक्तीने जोरात पळायचे. अर्थात, पानथळीपर्यंत म्हणजे पायाला पाणी लागेपर्यंत पळायचे. अशा प्रकारच्या विधी केल्या जायच्या. फक्त वाघ पळवताना कुत्रे मागे लागतात. पण, वाघ पळविण्याची मजा काही औरच असायची. आलेल्या मंडळीला निसर्गरम्य परिसरात केळीच्या पानावर जेवण वाढले जाते. अर्थात, पत्रावळ्यांचा वापर करु नये, अशी परंपरा होती. परंतु, बदलत्या काळात बदलही झाले असतील.

काही असो, हा एक सांस्कृतिक विधी असला तरी सामाजिकतेचे भान आणि निसर्गरम्य परिसरातलं जेवण तेही पानथळीच्या भागात... खूप मजेशीर असते. अर्थात, हे गवळदेव नवसाला पावणारे क्षेत्र जागृत देवस्थान समजले जाते. कित्येक लोकांना नवसात मागितलेल्या गोष्टींची पूर्ती झालेला अनुभव तेथे बांधलेल्या नवसाच्या घंटा पाहिल्यावर आपल्याला प्रत्यय येतो. गोळवण गावातील काही ख्यातनाम असे गवळदेव उत्सव पंचक्रोशीतच नव्हे तर, तालुक्यात प्रसिद्धीस आलेले आहेत. विशेषतः बोरकरवाडी येथील गवळदेव म्हणजे जागृत देवस्थान असल्याची प्रचिती येते. पोईप विरण रस्ता आणि गोळवण मसदेतीठा रस्ता यांना जोडणारी एक मध्यवर्ती पायवाट लागते. बांबर क्षेत्रात ओढ्याजवळ घनदाट वनराईत पहुडलेला निसर्गरम्य परिसर.. आल्हाददायक गारवा.... सुखद मन प्रसन्न होणारं वातावरण.... तेथेच या वाडीचा गवळदेव साजरा केला जातो. तिथे जवळच तीन पिढ्यांची वाटचाल करणारे मांजरेकर यांचे दुकान प्रसिद्ध आहे. तसेच धवडकी वाडी येथील महापुरुष देवस्थानाजवळच श्रीदेवगवळदेव पूजन केले जाते. हेसुद्धा जागृत देवस्थान आहे. नवसाला पावणारे असे अनुभूतीदर्शक क्षेत्र आहे. येथील होळी खास प्रसिद्ध... या होळीजवळ बोललेला नवस १०० टक्के पूर्ण होतोच, अशी येथील लोकांची श्रद्धा आहे. **

# इमानदारी, मेहनत आणि सातत्याच्या जोरावर जग जिंकले

नाव सूरज चव्हाण. मराठी बिग बॉस विजेता. काय होतं या सूरज चव्हाण कडे. काहीच नव्हतं. पण बिग बॉसचा विजेता झाल्या नंतर नाव मिळालं पैसा मिळाला, प्रसिद्धी मिळाली. बिग बॉसमध्ये यायच्या आधी तो फक्त रिल्स बनवायचा. एवढाच काय तो त्याचा उद्योग. त्याच्या रिल्स पाहून काही लोकांनी त्याला खूप नावे ठेवली. हेवा केला, तिरस्कार केला. अगदी त्याच्या रंगावरून, दिसण्यावरून, बोलण्यावरून त्याला काहींनी टोमणे मारले. पण तो त्याचं काम करत राहिला. लोकांच्या टोमण्याने तो खचला नाही. हरला नाही. थांबला नाही. तो मेहनत करत राहिला. नव्या जोमाने, नव्या उत्साहाने आणखी रिल्स बनवत राहिला. आणि त्याचं हेच सातत्य त्याला बिग बॉसपर्यंत घेऊन पोहोचलं. त्याला अनेक लोक बरे-वाईट बोलले. अगदी त्याला बिग बॉसमध्ये का घेतलं इथपर्यंत लोकांनी प्रश्न विचारले. त्याच्याकडून घेण्यासारखं असं काय आहे, इथपर्यंत लोक विचारू लागले. त्याच्याकडे कुठलीही कला नव्हती. त्याला कुणाचे साहाय्यं नव्हते. घरची गरिबी. त्यात आई-वडीलही नाहीत. बहिणींनी सांभाळ केलेला. अक्षरशः दोन वेळेचं पोटभर जेवण मिळेल की नाही याची शाश्वती नव्हती. अशा भयानक परिस्थितीत फक्त रील बनवायचा छंद त्याला. हा छंदच त्याला पुढे कोणीतरी मोठा बनवणार होता. बिग बॉसमध्ये यायच्या आधी अक्षरशः त्याने बिग बॉसला नकार दिला होता. कारण, त्याला त्याची मर्यादा माहीत होती. पण म्हणतात ना, उपरवाला देता है छप्पर फाड के देता है. अगदी काहीसं तसंच झालं या सूरज चव्हाणसोबत. नाही नाही करता पट्ट्याची वर्णी बिग बॉसमध्ये लागलीच. आणि परिणाम तुमच्यासमोर.




निलेश साठे

त्यानं जग जिंकलं. खिशात रुपया नाही. खायचे वांदे. कपडे नीटसे नाहीत. बिग बॉसमध्ये गेला, बिग बॉसचा विजेता ठरला. नाव मिळालं, प्रसिद्धी मिळाली, पैसा मिळाला. खिशात काही नसताना. एवढं सर्व मिळणे. गरिबीतून वरती येणे. म्हणजे जग जिंकल्यातच तर जमा आहे की. शून्यातून विश्व निर्माण करणे म्हणतात ते हे असं. नियतीचा थोडाफार भाग असेल. पण, त्याचे कर्म त्याच्यासोबत होते. त्याच्याकडून शिकण्यासारखं काय आहे तर ते हेच आहे की, जे काम करायचं त्याच्यामध्ये संपूर्ण जीव ओतायचा. एनर्जी, जोश आणि उत्साहाने कार्य करायचं. आत्मविश्वासाने करायचं. इमानदारीने करायचं. आणि सातत्याने करायचं. कोणत्याही कार्यात सातत्य राखलं तर नियतीलाही एक ना एक दिवस आपल्यासमोर झुकावंच लागेल. हे त्याच्याकडून शिकायला मिळतं. त्यानं जेही काही काम केलं ते अगदी इमानदारीने केलं. त्यानं कोणाचा हेवा केला नाही, तिरस्कार केला नाही. वाईट भावना त्याच्या मनाला कधी शिवली नाही. त्यानं कधी कुणाचं वाईट वाटून घेतलं नाही, अतिशय प्रामाणिकपणे तो खेळ खेळत राहिला. हे त्याच्याकडून शिकण्यासारखं आहे. आजही तो एखाद्या सेलिब्रिटीला भेटतो तेव्हा तेव्हा त्यानं मारलेली मिठी ही फार वेळ तो तशीच धरून ठेवतो, लवकर सोडत नाही. म्हणजे ती सुटत नाही, यावरून तो किती साधा आहे, इमानदार आहे, सच्चा आहे याची प्रचिती येते. इमानदारी, मेहनत आणि सातत्याच्या जोरावर जग जिंकता येतं, हे त्यानं दाखवून दिलं. आजही काही लोक त्याचा हेवा करतात. अरे पण, त्याचा हेवा करावा, असं त्याच्याकडे काही आहेच नाही. त्याचं बोलणं तुम्हाला नाही आवडलं, जगाला आवडलं. त्याचं रूप तुम्हाला नाही आवडलं, जगाला आवडलं. केवळ तो गरीब होता, दिसायला सुंदर नव्हता म्हणूनच काहींनी त्याचा हेवा केला. नियतीनं त्याला मोका दिला. तो पुढे गेला. आता तो गरीब नाही राहणार. करा किती हेवा करायचा तेवढा करा. तो पट्ट्या आता मागे येत नसतो. त्याच्याकडे पाहायचंच झालं तर त्याची जिद्द, त्याची चिकाटी, त्याची मेहनत, त्याचं सातत्य आणि त्याची इमानदारी एवढाच काय तो धडा घ्यायचा. नियती प्रत्येकाला मोका देते. आता दुसऱ्याला नाव ठेवत बसायचं की त्याच्याकडून काही बोध घेऊन स्वतःचं आयुष्य सावरायचं हे आपल्याच हातामध्ये आहे नाही का? **

कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
www.krushival.in
रविवार दि. १७ नोव्हेंबर, २०२४


# राज्यात परिवर्तन करा, मविआचे सरकार आणा

## ■ पी. चिदंबरम यांचे मतदारांना आवाहन

। मुंबई । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य स्थापनेपासून काँग्रेस सरकारने आखलेल्या ध्येय धोरणांमुळे महाराष्ट्र देशात सर्वच क्षेत्रात आघाडीवर राहिलेले राज्य आहे. मुंबई ही आर्थिक राजधानी आहे. परंतु, मागील काही वर्षात भाजप सरकारमुळे महाराष्ट्राची सर्वच आघाड्यांवर पिछेहाट झालेली आहे. महाराष्ट्राचे प्रकल्प दुसऱ्या राज्यात गेल्याने गुंतवणूक व रोजगारही गेले. शेतकरी संकटात असल्याने आत्महत्या वाढल्या आहेत. दरडोई उत्पन्नात महाराष्ट्राची घसरण झाली असून, कर्नाटक, तेलंगणा, तामिळनाडू, गुजरात, हरियाणा ही राज्ये पुढे गेली आहेत. महाराष्ट्रातील भाजप युती सरकार गुजरातच्या इशाऱ्यावर चालत असून, आता महाराष्ट्रात परिवर्तन करून मविआचे सरकार आणा, असे आवाहन माजी केंद्रीय अर्थमंत्री खासदार पी. चिदंबरम यांनी केले आहे.

टिळक भवनमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेला संबोधित करताना पी. चिदंबरम यांनी आकडेवारीसह भाजपा राजवटीत महाराष्ट्राची अधोगती कशी झाली हे सविस्तरपणे सांगितले. ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न ९.६ वरून ७.६ टक्क्यांवर घसरले आहे, कृषी क्षेत्रात ४.५ टक्क्यांवरून १.९ पर्यंत घसरण झाली आहे, सेवाक्षेत्रात १३ टक्क्यावरून ८.८ टक्के घरसण, बांधकाम क्षेत्रात १४.५ टक्क्यांवरून ६.२ टक्के घरसण झालेली आहे, वित्तीय तूट वाढलेली आहे. सरकार पैसे खर्च करत आहे, पण कोणत्याही क्षेत्रात वृद्धीदर वाढलेला दिसत नाही.



महाराष्ट्रात आज बेरोजगारीची समस्या अत्यंत बिकट असून, बेरोजगारीचा दर १०.८ टक्के आहे. पगारी नोकरी करणाऱ्यांच्या संख्येत ४० टक्क्यांवरून ३१ पर्यंत घरसण झाली आहे, तर ४० टक्के लोक स्वयंरोजगार करत आहेत. १८ हजार पोलीस भरतीसाठी ११ लाख अर्ज आले होते, तर ४६०० तलाठी पदांसाठी ११.५ लाख लोकांनी अर्ज केले होते. यातून बेकारीची अवस्था किती गंभीर आहे हे स्पष्ट होते. महाराष्ट्र राज्यात गुंतवणूक करण्यासाळ मोठे उद्योग तयार होत, त्यासाठी परस्पर सामंजस्य करारही केले, प्रकल्पासाठी जागा निश्चित केली, पण त्यानंतर हे प्रकल्प दुसऱ्या राज्यात गेले. रायगडमध्ये होणारा बल्क ड्रग्ज प्रकल्प, तळेगावमध्ये होणारा सेमीकंडक्टरचा वेदांता फॉक्सकॉन प्रकल्प, नागपूरला होणारा टाटा एअरबस प्रकल्प हे महाराष्ट्रातून कोणत्या राज्यात गेले हे लहान मुलगाही सांगू शकतो. रोजगार देणारे मोठे प्रकल्प जर दुसऱ्या राज्यात गेले, तर महाराष्ट्रातील तरुणांना रोजगार मिळणार कुठून? असा सवाल चिबंरम यांनी उपस्थित केला.

शेतकऱ्यांच्या बाबतीतही भाजपा सरकारचे ठोस धोरण नाही. उलट, भाजपा सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे महाराष्ट्रातील शेतकरी संकटात सापडलेला आहे. आज महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत, मागील एका वर्षात महाराष्ट्रात २८५१ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली आहे. शेतकरी मोठ्या संकटात असताना त्यांना कर्जमाफी देऊन त्याच्यावरचे ओझे उतरवले पाहिजे. पण, भाजपा सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली नाही. महाराष्ट्रातील १७.४ टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेच्या खाली आहे, असेही चिदंबरम यांनी सांगितले. रोजगार निर्मितीवर बोलताना चिदंमबर म्हणाले की, रोजगार आहेत, वैद्यकीय क्षेत्रात, शिक्षण क्षेत्रातही अनेक लोकांची गरज आहे. आज या क्षेत्रात पदे रिक्त आहेत, ती भरली पाहिजेत. काँग्रेसच्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यातही रोजगारनिर्मितीचा आराखडा दिला आहे, असे चिदंबरम यांनी स्पष्ट केले.

# ‘मविआ’ शेतकरी हितासाठी कटिबद्ध : गांधी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या हितासाठी महाविकास आघाडी महत्त्वाचे निर्णय घेत असून, सोयाबीनला प्रतिक्विंटल ७ हजार रुपये भाव, तसेच बोनस देऊ,’ अशी घोषणा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शनिवारी केली. कांदा व कापूस उत्पादकांनाही मेहनतीचे फळ मिळेल, असे आश्वासन त्यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिले आहे.

काँग्रेसने यापूर्वी पंचसूत्री जाहीर केली आहे. यात शेतकरी, महिला, कामगार व युवकांना विविध योजनांची घोषणा केली आहे. परंतु, यात सोयाबीनच्या शेतकऱ्यांना हमी भावाची घोषणा नव्हती. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ‘एक्स’ या समाजमाध्यमावर पोस्ट करत महाविकास आघाडी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी ऐतिहासिक पाऊल उचलणार असल्याचे म्हटले आहे. सोयाबीनला ७ हजार रुपये प्रति क्विंटल हमी भाव तसेच बोनसही देऊ, याशिवाय कांद्याचा भाव ठरविण्यासाठी एक समिती स्थापन करू आणि कापसालासुद्धा किमान हमी भाव (एमएसपी) देण्यात येईल, अशा घोषणा राहुल गांधी यांनी केल्या आहेत.



उमेदवारांची महामार्गांवर

# बॅनर स्पर्धा

। पाली । वार्ताहर ।

विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. दरम्यान, वेगवेगळ्या मार्गाने उमेदवार मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. डिजिटल प्रिंट माध्यमातून शहरात तसेच महामार्गाच्या कडेला लावलेल्या बॅनरला देखील महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र, या बॅनरचा आकार प्रचंड मोठा असून ठिकठिकाणी जणू काही मोठ्या बॅनरची स्पर्धा लागल्यासारखे जाणवत आहे. मुंबई-गोवा, पाली-खोपोली, मुंबई-पुणे, मुंबई-बेंगलोर या महामार्गांवर मतदारांचे लक्ष वेधून घेण्यासाठी उमेदवारांनी आपले मोठाले बॅनर लावले आहेत. शिवाय शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी मुख्य चौकात देखील बॅनर लागले आहेत.



# सव्वा लाखाची रोकड जप्त

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल विधानसभा मतदारसंघ, निवडणूक विभाग, आचारसंहिता पथकांतर्गत शनिवारी (दि.१६) सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास धानसर टोल नाका येथे सव्वा लाखाची रोकड जप्त करण्यात आली आहे.

कल्याण शिळफटा ते कळंबोलीच्या दिशेने जाणाऱ्या पनवेल तालुक्यातील धानसर टोल नाका येथून जाणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या संशयीत क्रेटा कंपनीची चारचाकी गाडीला थांबविण्या आले आणि तिची तपासणी करण्यात आली. यावेळी या चारचाकी गाडीत असलेल्या तपकीरी रंगाच्या बॅगमध्ये १ लाख २६ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम आढळून आली. स्थिर सर्वेक्षण पथक क्र. ०१ मार्फत ही रोख रक्कम जप्त करण्यात आली असून ही कारवाई पनवेले विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन

। रायगड । प्रतिनिधी ।

आगामी विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड थळतर्फे सरखेल कान्होजी आंग्रे वसाहतीमध्ये शनिवारी (दि.१६) मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात महाव्यवस्थापक मानव संपदा हरळीकर यांसह कर्मचारी व प्रशिक्षणार्थी बहुसंख्येने सहभागी झाले होते.




नागरिकांमध्ये मतदान करण्याबाबत जनजागृती व्हावी, मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी आगामी विधानसभा निवडणुकीत स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्याबाबत भारत निवडणूक आयोगाचे निर्देश आहेत. या अनुषंगाने कारखान्यातील कामगारांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने अलिबाग-मुरूड-रोहा विधानसभा मतदार संघ तथा उपविभागीय अधिकारी अलिबाग मुकेश चव्हाण यांनी आरसीएफ व्यवस्थापनाला एका पत्राद्वारे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत आरसीएफ थळ तर्फे सरखेल कान्होजी आंग्रे वसाहतीमध्ये मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमात महा व्यवस्थापक मानव संपदा व प्रशासन संजीव हरळीकर, मुख्य प्रशासकीय व्यवस्थापक (प्रभारी) महेश पाटील, वरिष्ठ मानव संपदा व्यवस्थापक प्रशांत म्हात्रे, वरिष्ठ व्यवस्थापक हितेश थळे (मानव संपदा विकास), वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी संतोष वझे यांसह कर्मचारी व प्रशिक्षणार्थी बहुसंख्येने सहभागी झाले होते.


कुरुळ


नारंगी


पेढांबे


रामनाथ


सहाणगोठी


रामराज

# प्रचाराचा झंझावात




कामार्ले


रांजणखार


दिवी पारंगी


बेलोशी


काकळघर


बोर्ली


आक्षी

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)